

कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान सर्वत्र पूज्यते।

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार


**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine April 2025 - Pages - 60**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे

कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७६ * अंक ६ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




दि. १७ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ३० च्या १०४ व्या वर्धापनदिनी संस्थापक कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण प्रसंगी संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, यांच्या समवेत डावीकडून अध्यापिका सौ. रूपाली चौथाई, अध्यापक श्री. युवराज मिरखलकर, प्राचार्य व्ही. पी. गावडे, अध्यापक डॉ. ज्ञानेश्वर दाते आणि अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



घाटकोपर शाखा ४८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी गणेश पूजन करताना संस्थेचे हितचिंतक श्री. गिरीश जोशी व सौ. रेवा जोशी, पाठीमागे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संस्थेचे इंटरनल ऑडिटर श्री. तु. रं. दौंडकर, अनुसंधान समिती सदस्य व माजी कार्याध्यक्ष श्री. के. एन. शिरकांडे, उपस्थित माजी विद्यार्थी, विविध विभागांचे प्राचार्य, मुख्याध्यापिका आणि पर्यवेक्षिका

## ❊ कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे ❊



वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी मा. सदानंद कसल्लू, डेप्युटी कमिशनर, (इन्कम टॅक्स डिपार्टमेंट) यांचा सत्कार करताना संचालक डॉ. राजेंद्र कांबळे समवेत संचालक श्री. सुनील रेडेकर, डॉ. अरुण अडसूळ (माजी कुलगुरू) सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड

## ❊ अभियांत्रिकी महाविद्यालय आणि श्रीकृष्ण सदाशिव धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक ❊



'व्यवस्थापन विषयातील प्रगती' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषद प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. डॉ. विशाल नरांजे, अमिटी युनिर्व्हसिटी, दुबई यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि श्री. राकेश बच्छाव, सहाय्यक जनरल मॅनेजर, योटटा टेक्नॉलॉजी, युएसए

संपादकीय

# श्री रामदासस्वामींची शिकवण

श्री रामदास्वामींनी प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून संपूर्ण समाजाचे उन्नयन करण्याचे कार्य केले. रामदासस्वामी हे साधरणतः वारकरी संप्रदायाच्या तुकाराम महाराजांचे समकालीन.

रामदासस्वामींनी बारा वर्षे तपश्चर्या करून, बारा वर्षांचे पुरश्चरण केले. पुरश्चरण काळात रामदासस्वामींनी देशकालपरिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले. 'बुडते हे जन, न देखवे डोळा ।' या समाजाप्रतीच्या असीम कळवळ्यातून रामदासस्वामींनी लोकजागृतीचे आणि समाजावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून तद्निवारणाचे कार्य केले. लोकांचे आत्मभान जागृत करून, त्यांना ताठ मानेने जीवनाला सामोरे जाण्याची शिकवण देण्यासाठी रामदासस्वामींनी समाजापुढे 'कोदंडधारी' श्रीरामाचा आदर्श ठेवला.

निर्बलांच्या क्षमेला काहीही अर्थ नसतो म्हणून समजाला बलोपासनेचे धडे दिले. गावोगावी बलोपासनेचे दैवत असलेल्या श्री मारूतीरायांची देवळे स्थापन केली आणि बलोपासनेचे तत्त्व समाजात रूजवले. अनेकठिकाणी मठ स्थापन करून, समाजात नीतीमूल्ये, सदाचार, स्वातंत्र्य ही तत्त्वे रूजवण्याचा प्रयत्न केला. एकीचे बळ जाणून समाज एकसंध करण्यासाठी व राखण्यासाठी धार्मिकतेच्या व्यासपीठावरून जनजागरण केले. कीर्तन प्रवचनातून लोकशिक्षण केले. खरा धर्म हा कर्मकांडात नसून मानवतेसाठी झटण्यात आहे हे तत्त्व समाजमानसावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी 'दासबोध', 'मनाचे श्लोक' आणि निवडक रामकथेवर ग्रंथ रचना केली.

'देशकाल वर्तमाने । आपण चिंताग्रस्त होती मने ।
म्हणती कैसे वाचतील जने?'

या प्रश्नाची उकल करण्यासाठी रामदासस्वामी झटत होते. त्याकाळच्या समाजात ''बळी तो काम पिळी'' हे तत्त्व रूजले होते.

' न्याये बुडाला, बुडाला, जाहाली सिर्जोरी'

अशी अवस्था होती. देशाची कंगाल स्थिती आणि लोकांच्या असह्य यातना पाहून व्यक्ती व्यक्तीवर होणाऱ्या अन्यायाचे निर्दलन करण्यासाठी 'एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' ही शिकवण रामदासस्वामींनी दिली. ज्यास अन्यायाबद्दल त्वेष नाही, द्वेष नाही आणि मानाने ज्याला पार सोडले आहे, तसेच ज्याच्या जीवनात स्वातंत्र्याबद्दल आस नाही, परिपूर्णतेबद्दल ओढ नाही असे मानवी जीवन, पशुतुल्यच आहे. मानवी बुध्दीचा सुयोग्य वापर करून जीवन उपभोगावे, जन जागरण करावे असे रामदास्वामी सांगतात.

' काही समुदाय करणे। येविषयी आलस्य ना कारणे ।
पेहणारे बुडते तारावे । सामर्थ्ये बुडो नेदावे ।।
मूर्ख ते शहाणे करावे । विवेकी पुरुषे ।।'

असे आपल्या प्रमुख महंत शिष्यांना रामदासस्वामी सांगतात.

‘ शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे ।
उणे पडू नेदावे । कोणी येकाचे ।।’

अशा शब्दात एका वेगळ्या प्रकारे व्यक्तीची सामाजिक बांधिलकी रामदासस्वामी स्पष्ट करतात. ‘आधी केले मग सांगितले’ या उक्तीवर रामदासस्वामींचा भर होता.

‘ उत्तम भव्य तेचि घ्यावे । मिळमिळीत अवघेचि टाकावे ।
निःस्पृहपणे विख्यात व्हावे । भूमंडळी । ’

असे सामदासस्वामी सांगतात.

‘सदा सर्वदा देव सन्निध आहे’ या भावनेने वागल्यास पापाचरणाचा कल आपोआपच कमी होतो. ‘येकही जमीन, येकही पानी’ हे ध्यानी घेऊन प्रपंच नेटका करण्यासाठी कुसंगती टाळावी.

‘मुख्य हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण ।’ हे जाणून व्यक्तीने आपले आचरण ठेवावे. जीवनाचे सोने करण्यासाठी सगुणोपासना करणे सोयिस्कर असले तरी, सगुणातच अडकून न राहता निर्गुणाकडे वाटचाल करावी. त्यासाठी ‘अचपळ मनाला काबूत ठेवण्यासाठी,

‘ प्रभाते मनी राम चिंतीत जावा,
पुढे वैखरी राम आधी वदावा,
सदाचार हा थोर सांडू नये तो,
जगी तो चि तो मानवी धन्य होतो ’

हे लक्षात घेऊन प्रत्येकाने

‘ देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी।
मना सज्जना हेचि क्रिया धरावी ।
मना चंदनाचे परि त्वा झिजावे ।
परि अंतरी सज्जना नीववावे ।।’

असा उपदेश करत व्यक्ती आणि समाजमानस घडवण्याचा प्रयत्न रामदासस्वामी करतात.

दि. ३० मार्च २०२५
गुढीपाडवा

॥ विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥

# पुणे विद्यार्थी गृह

१७८६, सदाशिव पेठ, पुणे ३०. फोन नं.: २४४७०५७३, २४४७०९२७

स. न. वि. वि.

संस्थेचा ११६ वा वर्धापन दिन **सोमवार, दिनांक १२ मे २०२५** रोजी संपन्न होत आहे. संस्थेची आजपर्यंतची प्रगती आपणासारख्या हितचिंतक व आश्रयदाते यांचे सहकार्याने व सदिच्छांमुळे झालेली आहे. आपणाकडून लाभत असलेल्या या सहकार्याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत.

या वर्धापनदिनानिमित्त सायंकाळी ५ ते ६ या वेळेत वैदिक मंगल घोष (वेद घोष) आणि ६ ते ७.३० या वेळेत स्वागत - समारंभ आयोजित केला आहे. कृपया आपण या समारंभास अवश्य यावे ही नम्र विनंती.

• आपले नम्र •

| **दिनेश मिसाळ** | **कृष्णाजी कुलकर्णी** | **संजय गुंजाळ** | **अमोल जोशी** | **एस.एम. जिर्गे** | **राजेंद्र बोऱ्हाडे** |
|---|---|---|---|---|---|
| कुलसचिव | कोषाध्यक्ष | कार्यवाह | उपकार्याध्यक्ष | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

**व सर्व संचालक**

**स्थळ : पुणे विद्यार्थी गृह, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०**

## वाचन-चिंतन-लेखनाची दुर्मिळता

समाजातील बहुसंख्य माणसे कामाला कंटाळतात. काम करणे म्हणजे आपत्तीच वाटते त्यांना!! काम टाळण्याकडे किंवा काम न करण्याकडे बुहतेकांची प्रवृत्ती असते. खरे आहे की नाही?

आता कामात दोन प्रकार आहेत. एक केवळ यांत्रिक पद्धतीचे आणि दुसरे बुद्धी वापरून करण्याचे. बहुसंख्य लोक यांत्रिक काम-अंगमेहनतीचे किंवा साधे कारकुनी स्वरूपाचे पसंत करतात. त्यामुळे बुद्धी वापरून काम करणारांचे प्रमाण थोडे. पण तेच थोडे लोक समाजात पुढे येतात.

बुद्धीच्या कामात वाचन-चिंतन-लेखन यांचा समावेश होतो. पुष्कळ लोक वाचावयास तयार असतात. त्यांतील थोडे लोक जरा पुढे जाऊन चिंतन करू शकतात. पण चिंतन करावयास एकाग्रता व बुद्धीचे कष्ट लागतात. म्हणून चिंतकांचे किंवा विचारवतांचे प्रमाण समाजात थोडे असते.

अशा चिंतकांत लेखन करणारे आणखी थोडे असतात. कारण क्रमाक्रमाने वाचन, चिंतन व लेखन या कार्यात अधिकाधिक बौद्धिक कष्ट पडतात.

ज्या समाजात शारीरिक व बौद्धिक कष्ट घेणारे लोक अधिक तो समाज जिवंत राहतो. कारण विचारवंत आपल्या लेखणीने नव-नवीन विचार समाजाला देतात आणि कष्ट घेणारे लोक या विचारांचे कृतीत रूपांतर करतात.

भौतिक सुखे आणि वैचारिक जिवंतपणा ही दोन्ही आपल्याला पाहिजेत. त्या करिता शारीरिक आणि बौद्धिक दोन्ही कष्ट घ्यावयाची सर्वांना सवय पाहिजे.

**डॉ. ग. श्री. खैर (एप्रिल १९५७)**

स्थापना : १२ मे १९०९

# पुणे विद्यार्थी गृह
# पंचवटी नाशिक शाखा



श्री केशव महाराज

## शताब्दी वर्ष
दि. १७ मे २०२५ ते १६ मे २०२६




कुलगुरू दादासाहेब केतकर इंग्लिश स्कूल नवीन इमारत



श्री केशव महाराज मठ

स. न. वि. वि.

पुणे विद्यार्थी गृह संस्थेची स्थापना दि. १२ मे १९०९ रोजी पुणे येथे झाली. संस्थेचे कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांनी दि. १७ मे १९२६ रोजी पंचवटी नाशिक येथे पहिल्या शाखेचा शुभारंभ केला. दि. १७ मे २०२५ रोजी या शाखेचा ९९ वा वर्धापनदिन असून या दिवशी शताब्दी वर्षास प्रारंभ होत आहे.

पंचवटी शाखेची गेली ९९ वर्षांची कारकिर्द व प्रगती आपणासारख्या हितचिंतक, देणगीदार, माजी विद्यार्थी व सेवक बंधूभगिनी यांचे बहुमोल सहकार्य व सदिच्छांमुळे झालेली आहे. त्याबद्दल संस्था आपली सर्वांची अत्यंत ऋणी व आभारी आहे.

*** दि. १७ मे २०२५ वर्धापन दिन कार्यक्रमाची रूपरेषा ***

| | | | |
|---|---|---|---|
| * सकाळी १० ते १२ | रूद्राभिषेक व सत्यनारायण पूजा | * सायं. ५ ते ६ | नवीन इमारत उद्घाटन |
| * सायं. ४ ते ५ | रामरक्षा पठण | * सायं. ६ ते ८ | स्वागत समारंभ |

तरी कृपया आपण या समारंभास अवश्य यावे ही नम्र विनंती.

* आपले नम्र *

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **दिनेश मिसाळ** | **कृष्णाजी कुलकर्णी** | **संजय गुंजाळ** | **अमोल जोशी** | **एस. एम. जिर्गे** | **राजेंद्र बोऱ्हाडे** |
| कुलसचिव | कोषाध्यक्ष | कार्यवाह | उपकार्याध्यक्ष | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

**व सर्व संचालक**

**स्थळ : पुणे विद्यार्थी गृह, नाशिक शाखा, ४२६६, पंचवटी, नाशिक ४२२००३.**



श्री. अमोल जोशी

## संस्थेच्या उपकार्याध्यपदी श्री. अमोल जोशी यांची निवड

संस्थेच्या कौन्सिल व संचालक मंडळाची सभा दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झाली.

श्री. अमोल जोशी हे संस्थेचे माजी विद्यार्थी, देणगीदार व अनुभवी सेवक असून दि. १७.११.२०११ पासून ते संस्थेचे आजीव सभासद म्हणून कार्यरत आहेत. सध्या ते नाशिक शाखा व तळेगांव (अंजनेरी) या शाखांचा संपूर्ण कार्यभार उत्तमरित्या पाहात आहेत.

श्री. अमोल जोशी यांनी दि. १.७.२०२१ ते दि. ३१.१२.२०२३ या कालावधीमध्ये संस्थेच्या कुलसचिव पदाचा कार्यभार उत्तमरितीने पार पडला आहे.

श्री. अमोल जोशी यांना संस्थेची कार्यपध्दती, घटना, ध्येय-धोरणे आणि उद्दिष्ट्ये यांची परिपूर्ण माहिती असल्याने त्यांची दि. १.३.२०२५ ते ३१.१२.२०२६ या कालावधीकरिता संस्थेच्या उपकार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली. त्यांच्या हातून संस्थेचा विकास व प्रगतीचे कार्य घडेल असा विश्वास संस्थेच्या कौन्सिलला वाटतो. हे कौन्सिल त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत असून भावी कार्यास व वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करीत आहे. ***

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**

**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

### आय इ डी एस एस ए डी २ झोन ॲथलेटिक्स स्पर्धा

इंटर इंजिनियरिंग डिप्लोमा स्टुडंट स्पोर्ट्स असोसिएशन डी २ झोन पुणे यांच्यामार्फत डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांसाठी ॲथलेटिक्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे आयोजन करण्याची जबाबदारी मुद्रण तंत्र संस्थेकडे होती. दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी कै. बाबुराव सणस क्रीडांगण, सारसबाग, पुणे येथे १०० मीटर, १५० मीटर धावणे, उंच उडी, लांब उडी, गोळा फेक, भालाफेक इ. स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये डी २ झोन मधील दहा महाविद्यालयांमधील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर स्पर्धांचे यशस्वी संयोजन प्राध्यापक श्री. शंकर शेळकंदे व श्री. व्ही. व्ही. बोत्रे यांनी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहाय्याने केले.

### प्रिंटर्स डे

दि. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी 'जागतिक मुद्रण दिन' प्रसंगी आयोजित कार्यक्रमामध्ये प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. द्वितीय वर्षातील विद्यार्थी कु. प्रणव तांगडे, कु. सौरव कदम व कु. ऋतुजा आहेर यांनी विद्यार्थ्यांना 'प्रिंटर्स डे' का साजरा करतात याविषयी माहिती दिली. प्रा. रोशन चौधरी यांनी सर जोहान्स गटेनबर्ग यांचे चरित्र व त्यांनी लावलेले शोध याविषयी माहिती दिली. प्रा. श्री. अक्षय रावेतकर यांनी प्रिंटिंग क्षेत्राचे महत्त्व आणि भविष्यातील संधी तसेच प्रिंटिंग शिक्षणासाठी मुद्रण महर्षी डॉ. प. भ. कुलकर्णी यांचे योगदान याविषयी माहिती दिली. प्रा. श्री. शंकर शेळकंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### औद्योगिक प्रशिक्षण

प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांनी आयोजित केलेल्या 'मॉडर्न मॅन्युफॅक्चरिंग' हा एक आठवड्याचा औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रम 'मेसर्स एल अँड टी स्किल ट्रेडर्स अकॅडमी, मुंबई' येथे दि. २४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पूर्ण केला. प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे यांना सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये 'बेस्ट पंक्चुॲलिटी ॲवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. **प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** *

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**

**मुख्याध्यापिका : सौ. मधुमती कदम (माध्यमिक)**

### मार्केट डे

शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेच्या आवारात मार्केट डे साजरा झाला. सर्व शिक्षकांनी मिळून शाळेचा सर्व परिसर सजवला होता. सगळीकडे भाजी मंडई सारखे वातावरण तयार केले होते. सर्व फळ भाज्या, पालेभाज्या, फळे अतिशय सुंदर रित्या मांडून ठेवण्यात आल्या होत्या. मुख्याध्यापिकांच्या हस्ते भाजी खरेदी करून या कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर सर्व पालकांनी भाजी खरेदी केली. सर्वांनी भाजीवाले झालेल्या आपल्या छोट्या विद्यार्थ्यांकडून भाज्या विकत घेतल्या. या दिवशी सर्व पालकांनी खूप आनंदाने भाज्या घेतल्या. सर्व विद्यार्थ्यांना सुद्धा खूप गंमत वाटत होती. विद्यार्थ्यांना त्यादिवशी भाजी मंडई कशी असते, भाज्या कशा विकत घेतात, विविध भाज्यांची नावे काय आहेत आणि फळांची नावं काय हे सुद्धा कळले. अशाप्रकारे मार्केट डे साजरा झाला.

### कम्युनिटी हेल्पर्स

शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी कम्युनिटी हेल्पर्स डे साजरा केला. सर्व शिक्षकांनी मिळून त्यादिवशी अतिशय छान पद्धतीने विद्यार्थ्यांना कम्युनिटी हेल्पर्स दाखवले. शिक्षिकांनी गोल्ड स्मिथ, ब्लॅक स्मिथ, बार्बर, टेलर, मिल्क मॅन, शेफ अशा सर्व प्रकारच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. सर्व विद्यार्थी सुद्धा टीचर, सोल्जर, फार्मर, पोलीस मॅन, अशाप्रकारे छान तयार होऊन आले होते. सर्व शिक्षकांनी कम्युनिटी हेल्पर्स म्हणजे कोण आणि ते काय करतात आणि त्यांचे महत्त्व काय हे मुलांना प्रत्यक्षात करून दाखवले. अशाप्रकारे कम्युनिटी हेल्पर्स डे अतिशय सुंदर रित्या पार पडला.

### स्काऊट गाईड दिन

सोमवार दि. २४ फेब्रुवारीला जागतिक स्काऊट गाईड दिन (चिंतन दिन) घेण्यात आला. मुख्याध्यापक यांच्या हस्ते बेडेन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रार्थना, सर्व धर्म प्रार्थना, मौन इ. कार्यक्रम घेऊन निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम, गाईड अधिकारी चंद्रकला शिंदे व स्काऊट अर्चना नायडू यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम पार पडला.

***

*** मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३० ***



**मार्केट डे प्रसंगी विविध भाज्यांची विक्री करताना विद्यार्थी - विद्यार्थिनी**

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

**राष्ट्रीय विज्ञान दिन व मराठी राजभाषा दिन साजरा**

शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन व मराठी राजभाषा दिन उत्साहात संयुक्तपणे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते भारतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण आणि अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार विष्णू वामन तथा तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित सर्व शिक्षकांनीही पुष्प अर्पण करून प्रतिमांचे पूजन केले. ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी केले. इ. ५ वी ते इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी भारतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण आणि अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार वि. वा. शिरवाडकर यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच महाराष्ट्र राज्यगीत, अग्रगण्य कवी वि. वा. शिरवाडकर यांची 'कणा' ही कविता म्हणून दाखवली. प्राचार्य व्ही. पी. गावडे आणि अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी भौतिकशास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण आणि वि. वा. शिरवाडकर यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. उपस्थितांचे आभार अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी मानले. अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी फलक लेखन केले. विज्ञान दिनाचे औचित्य साधून अध्यापक श्री. विठ्ठल अनभुले यांनी इ. ५ वी ते इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांकडून विज्ञानाचे प्रयोग करवून घेतले आणि विज्ञानावर आधारित रांगोळी काढून घेतली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली

**जागतिक महिला दिन**

दि. ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही प्रतिमापूजन केले. ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. इ. ६ वी च्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. इ. ५ वी ते इ. ९ वी तील विद्यार्थिनींनी समाजातील थोर महिलांच्या वेशभूषा परिधान करून त्यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच महिला दिन का साजरा केला जातो ? याविषयी माहिती दिली. इ. ८ वी च्या विद्यार्थिनींनी या प्रसंगी नृत्यही सादर केले. विद्यार्थी कु. स्वप्नील भोसले इ. ७ वी याने याप्रसंगी काव्य गायन केले. प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे, अध्यापक डॉ. ज्ञानेश्वर दाते आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका कु. लीना सोनवणे यांनी महिला दिनानिमित्त माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी केले. याप्रसंगी फलक लेखन श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी उपस्थितांचे आभार मानले. इ. ९ वी ब च्या विद्यार्थिनींनी या कार्यक्रमासाठी सुंदर रांगोळी काढली होती. या कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षतेकर कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी प्रशालेतील सर्व महिला शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते पेन भेट देण्यात आले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

***

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

**ओपन डे**

शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत शिशुगट व छोट्या गटाचा आणि ११.०० ते १२.०० या वेळेत मोठ्या गटाचा ओपन डे आयोजित करण्यात आला होता. यावेळी द्वितीय चाचणी परीक्षेच्या उत्तर पत्रिका पालकांना दाखविण्यात आल्या. तसेच उच्च माध्यमिक व माध्यमिक शालान्त परीक्षेनिमित्त होणाऱ्या शाळेच्या वेळ बदलाबाबतही शिक्षकांनी पालकांना माहिती दिली.

**स्पोर्टस् हॉल उपक्रम**

मंगळवार दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंतीनिमित्त शिशु व छोट्या गटातील विद्यार्थ्यांना स्पोर्ट्‌स हॉल मध्ये शिवाजी महाराजांवरील गोष्टी व गाण्यांचे व्हिडिओ दाखवण्यात आले.

## प्राथमिक विभाग

**शिक्षक - पालक सभा**

शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी तिसरी शिक्षक - पालक सभा आयोजित करण्यात आली होती.

**अभिनंदनीय**

❋ रविवार दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी गरवारे महाविद्यालयात स्वा. सावरकर वाङ्मय स्पर्धा समिती आयोजित वक्तृत्व स्पर्धा झाली. विविध शाळांमधील १५० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत आपल्या शाळेतील इ. ५ वी व इ. ६ वी च्या वर्गातील एकूण आठ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत कु. गौरांगी कुलकर्णी इ. ६ वी क व कु. देवांशी वाघ इ. ६ वी याना द्वितीय क्रमांकाचे मानचिन्ह व रोख रक्कमेचे बक्षीस मिळाले.

❋ दि. ४ व ५ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र मंडळ आयोजित आंतरशालेय मैदानी स्पर्धेत आपल्या शाळेने सर्वसाधरण विजेतेपद मिळवले. या स्पर्धेत ५२ पेक्षा अधिक शाळांमधील ९५० हून अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धेत यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे

**आठ वर्ष वयोगटाखालील मुले**

**वैयक्तिक खेळ**

**५० मी धावणे**

| | |
|---|---|
| कु. शिवराज शोभणे | प्रथम |
| कु. मल्हार जगदाळे | तृतीय |

**सांघिक खेळ**

**रिले टीम**

| | |
|---|---|
| कु. शिवराज शोभणे | प्रथम |
| कु. मल्हार जगदाळे | प्रथम |
| कु. वेदांत कापसे | प्रथम |
| कु. रियांश चौधरी | प्रथम |

**आठ वर्ष वयोगटाखालील मुली**

**वैयक्तिक खेळ**

| | | |
|---|---|---|
| लांब उडी | कु. श्रुती वळसे | प्रथम |
| ५० मी धावणे | कु. अवनी तांबेकर | तृतीय |

**सांघिक खेळ**

| | | |
|---|---|---|
| रिले टीम | कु. वैदेही ठाकूर | द्वितीय |
| | कु. लावण्या राठोड | द्वितीय |
| | कु. आराध्या गायकवाड | द्वितीय |
| | कु. अवनी तांबेकर | द्वितीय |

**दहा वर्ष वयोगटाखालील - मुले**

**वैयक्तिक खेळ**

| | | |
|---|---|---|
| ५० मी धावणे | कु. श्रीनिश आवारी | प्रथम |
| लांब उडी | कु. श्रीनिश आवारी | द्वितीय |

**सांघिक खेळ**

| | | |
|---|---|---|
| रिले टीम | कु. विराज देशमुख | द्वितीय |
| | कु. श्रीनिश आवारी | द्वितीय |
| | कु. राजवीर रासकर | द्वितीय |
| | कु. विश्वजीत जगदाळे | द्वितीय |

**दहा वर्ष वयोगटाखालील - मुली**

**वैयक्तिक खेळ**

| | | |
|---|---|---|
| ५० मी धावणे | कु. स्पृहा पवार | तृतीय |

**सांघिक खेळ**

| | | |
|---|---|---|
| रिले टीम | कु. साक्षी कुमार | द्वितीय |
| | कु. विभावरी कोल्हे | द्वितीय |
| | कु. स्पृहा पवार | द्वितीय |
| | कु. आर्या लोहार | द्वितीय |

**बारा वर्ष वयोगटाखालील मुले**

**वैयक्तिक खेळ**

| | | |
|---|---|---|
| ८० मी. धावणे | कु. हेरंब वाशीकर | द्वितीय |
| | कु. केयूर वाशीकर | तृतीय |

**सांघिक खेळ**

| | | |
|---|---|---|
| रिले टीम | कु. हेरंब वाशीकर | द्वितीय |
| | कु. केयूर वाशीकर | द्वितीय |
| | कु. वर्धन मारणे | द्वितीय |
| | कु. मयुरेश जगताप | द्वितीय |
| | कु. कृष्णा बुऱ्हाडे | द्वितीय |

**विजेत्या सर्व खेळांडूचे व शिक्षकांचे अभिनंदन**

शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी द्वितीय सत्रातील घटक चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी पालकांसोबत विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत चर्चा करण्यात आली.

मंगळवार दि. ११ फेब्रुवारी २०२५ पासून आपल्या शाळेत उच्च माध्यमिक शालांत व माध्यमिक शालांत परीक्षेचे केंद्र असल्यामुळे शाळेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.

## माध्यमिक विभाग

### इ. १० वी निरोप समारंभ

दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. १० वी चा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी इ. १० वी च्या मुलांना एस. एस. सी. बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. पर्यवेक्षिका सौ. जयती नरवणे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेबद्दलच्या सर्वसाधारण सूचना दिल्या. शिक्षिका सौ. अपर्णा रणधीर यांनी ''दहावीला सामोरे जाताना'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. सेजल शहा, इ. १० वी अ, विद्यार्थी कु. समर्थ ढेपे इ. १० वी ब, कु. शंतनु गायकवाड, इ. १० वी क, कु. ऐश्वर्या रणदिवे, इ. १० वी ड, कु. जान्हवी बोराडे, इ. १० वी इ या विद्यार्थ्यांनी शाळेविषयी, शिक्षकांविषयी आपली मनोगते प्रकट केली. यावर्षीचा स्वच्छ वर्ग या स्पर्धेचा चषक इ. १० वी क या वर्गाला देण्यात आला.

### 'संस्कृत पीठम्' उद्घाटन सोहळा

दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात 'संस्कृत पीठम्'चा उद्घाटन सोहळा पार पडला. या संस्कृत पीठम् अंतर्गत शाळेमध्ये संस्कृत भाषेविषयी वेगवेगळे उपक्रम, स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून अध्यात्मिक गुरू आणि तत्त्ववेत्त्या सौ. कल्याणी नामजोशी, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी उपस्थित होत्या. शिक्षिका सौ. माणिक जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी प्रज्ञाविवर्धन स्तोत्र म्हटले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. मोहना नातू यांनी करून दिला. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. या प्रसंगी दाखविण्यात येणाऱ्या व्हिडिओ फितीचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. नामजोशी यांनी आपल्या भाषणात मंत्रज्ञानाकडून तंत्रज्ञानाकडे

नेणाऱ्या संस्कृत भाषेचे महत्त्व सहज, सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. संस्कृत ही सर्वांगसुंदर भाषा कशी आहे आणि सगळ्या क्षेत्रातील लोकांसाठी कशी उपयुक्त आहे हेही सांगितले. विद्यार्थिनी कु. रमा मैंदर्गीकर इ. ९ वी अ हिने उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**एन. सी. सी. करियर गायडन्स**

दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ८ वी व इ. ९ वी च्या एन. सी. सी. कॅडेट्ससाठी संरक्षण दलातील करियर या विषयावर एअर विंग कमांडर श्री. प्राणी यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**लोहगड आणि पुरंदर किल्ल्यावर गिर्यारोहण**

दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी ''गिरीप्रेमी गिर्यारोहण संस्था, पुणे'' यांच्यातर्फे मुक्तांगण अॅडव्हेंचर क्लबच्या विद्यार्थ्यांसाठी लोहगड येथे गिर्यारोहण आयोजित करण्यात आले होते. तसेच दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ५ वी ते इ. ९ वी च्या मुक्तांगण अॅडव्हेंचर क्लबच्या विद्यार्थ्यांसाठी पुरंदर किल्ला येथे गिर्यारोहण आयोजित केले होते. यामध्ये १२६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन किल्ल्याच्या ऐतिहासिक महत्त्वाबद्दल माहिती घेतली.

**रोटरीक्लब तर्फे कार्यक्रमाचे आयोजन**

दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी रोटरी क्लब पुणे यांच्यावतीने इंटरअॅक्ट क्लबच्या विद्यार्थ्यांसाठी एक उपक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांचे ६ गट बनवून त्यांना वेगवेगळे विषय देण्यात आले होते. या विषयावर विद्यार्थ्यांनी विविध चित्रफिती बनवून त्यांचे सादरीकरण केले. प्रत्येक गटाला प्रोत्साहनपर प्रत्येकी एक एक चषक देण्यात आला.

**करिअर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन**

दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात इ. ८ वी व इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांकरिता श्री. मनोज अंबिके यांचे करिअरविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते.

**चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग**

दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी अॅस्ट्रॉनॉमी क्लबच्या इ. ९ वी चे ७ विद्यार्थी, आयुका, पुणे ९ आयोजित केलेल्या प्रश्न मंजुषा, निबंध स्पर्धा, चित्रकला अशा विविध स्पर्धांमध्ये सहभागी झाले.

**चाचणी परिक्षेच्या उत्तरपत्रिकांचे वाटप**

दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी द्वितीय सत्रातील घटक चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे वाटप करण्यात आले. शिक्षकांनी पालकांबरोबर विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत चर्चा केली.

**अभिनंदनीय**

दि. १ फेब्रुवारी २०२५ पासून सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी मुक्तांगण इंग्लिश व कनिष्ठ महाविद्यालयाच्या माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक विभागाच्या प्राचार्या म्हणून पदभार स्वीकारला. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांचे हार्दिक अभिनंदन.

## उच्च माध्यमिक विभाग

**इ. ११ वी साठी ओरिएंटेशन प्रोग्रॅमचे आयोजन**

दि. २९ जानेवारी २०२५ रोजी इ. ११ वी चे विद्यार्थी व पालक यांच्यासाठी एक ओरिएंटेशन (अभिमुखता) कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

पुढील वर्षी इ. १२ वी मध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सौ. स्वाती निकम यांनी १२ वी च्या दृष्टीने उपयुक्त अशी माहिती दिली. मोबाईलचा कमीत कमी वापर, नियोजनपूर्वक अभ्यास हेच इ. १२ वी मध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याचे गमक आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच आपल्या महाविद्यालयाची संपूर्ण माहिती पालकांना दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विषयाच्या शिक्षिका सौ. प्रचिती परांजपे यांनी केले.

### रस्ता सुरक्षा अभियान

दि. २९ जानेवारी २०२५ रोजी इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सकाळ सोशल फाऊंडेशन व मर्सिडिज बेन्झ यांच्यावतीने ''रस्ता सुरक्षा अभियान'' या एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये रस्त्यावर चालत असताना पादचाऱ्यांनी पाळावयाचे नियम, वाहन चालकांनी वाहन चालवताना पाळावयाचे नियम यासंबंधी चित्रफितीद्वारे माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. तसेच रस्त्यावर अथवा द्रुतगती मार्गावर अपघात घडला तर काय करावे याबाबतचे प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांच्या मदतीने दाखविण्यात आले. यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके देण्यात आली.

***

## कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

### ग्रंथालय उपक्रम

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात ''वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' अंतर्गत राबविण्यात आलेले उपक्रम खालील प्रमाणे.

### सामूहिक वाचन दिन

सामूहिक वाचनामुळे वाचन कौशल्य वाढते, एकत्रित शिकण्याची सवय लागते, समज आणि अर्थग्रहण क्षमता सुधारते, आत्मविश्वास वाढतो, श्रवण कौशल्य सुधारते, संवाद कौशल्य वाढते व वाचनाची गोडी लागते अशा शब्दात महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी सामूहिक वाचन दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.

### पुस्तक परीक्षण स्पर्धा

पुस्तक परीक्षणामुळे विचारशक्ती आणि विश्लेषण कौशल्य विकसित होते, पुस्तकातील पात्र, घटना आणि संदेश यांचा सखोल विचार करून त्यावर मत मांडण्याची संधी मिळते. अशा स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

### वाचन कौशल्य कार्यशाळा

या कार्यशाळे अंतर्गत आय.क्यू.ए.सी कोऑर्डिनेटर डॉ. स्वाती जोशी आणि उपप्राचार्या रेखा जोशी यांनी वाचनाचे महत्त्व स्पष्ट करत त्यांना वाचनाची आवड कशी निर्माण झाली हे त्यांच्या अनुभवातून व्यक्त केले.

### पुस्तक प्रदर्शन

विविध पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या उपप्राचार्या रेखा जोशी यांनी केले. तसेच कवितांचे वाचनही याप्रसंगी करण्यात आले. वरील नमूद केलेल्या सर्व उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग होता.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ व कवयित्री सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांची १९३ वी जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून साजरी केली. स्त्री उद्धारासाठी आपले वर्चस्व वाहून, महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतलेल्या समाजोद्धाराचा वसा तितक्याच नेटाने पुढे नेणाऱ्या सावित्रीबाईंना जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विनम्र अभिवादन केले.

## स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ

महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. सदानंद कसल्लू (डेप्युटी कमिशनर, इन्कम टॅक्स एक्झमशन) तर सन्माननीय अतिथी म्हणून डॉ. अरुण अडसूळ (माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी) लाभले. तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाचा हेतू स्पष्ट करत लाभलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक तसेच मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना ''आयुष्यात ध्येयप्राप्ती कशी केली पाहिजे आणि ती करण्यासाठी कोणकोणते गुण अंगीकारले पाहिजेत, निर्णय घेण्यासाठी ठाम राहिले पाहिजे, आयुष्यात येणाऱ्या संकटांना धैर्याने व साहसाने कसे सामोरे केले पाहिजे, कोणत्याही प्रकारचा न्यूनगंड बाळगू नका, शिक्षक व पालकांचा आदर करा, प्रामाणिक होऊन आत्मविश्वासू बना, गरजूंना सहाय्य करा'' अशा मार्मिक शब्दात मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक वासुदेव वाघ (ॲनिमेशन डिपार्टमेंट) यांनी सुरेल बासुरी वादन केले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विविध नृत्य प्रकार सादर करत उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका प्रियंका खुटवड यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टपणे पार पाडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका ज्योती पाटील, महाविद्यालयाच्या उपप्राचार्या रेखा जोशी. डॉ. ज्ञानदेव निटवे व सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील यांनी केले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतरवृंद उपस्थित होता. पसायदानंतर कार्यक्रमाची सांगता करून सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

***

**✻ कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे ✻**



ग्रंथालय विभागात सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.
याप्रसंगी उपस्थित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**
**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**
**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## इ अॅण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

### इलेक्ट्रॉनिक कौशल्य विकास या विषयावर कार्यशाळेचे आयोजन

दि. २ सप्टेंबर २०२४, २२ फेब्रुवारी २०२५ आणि २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत (आय अँड आय) च्या विद्यार्थ्यांसाठी ''इलेक्ट्रॉनिक कौशल्य विकास कार्यशाळा'' उद्योग तज्ज्ञ प्रा. सी. बी. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांचे इलेक्ट्रॉनिक कौशल्य वाढवणे, त्यांना प्रत्यक्ष अनुभव देणे आणि नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देणे हा होता. या कार्यक्रमासाठी विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांनी मार्गदर्शन केले. तसेच या कार्यशाळेसाठी समन्वयक म्हणून प्रा. महेश पोतदार, प्रा. उषा वालके, प्रा. कोमल वानझारे यांनी काम पाहिले.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दि. २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२५ रोजी जीएमआरटी (जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप) येथे सेंटर फॉर सिटीझन सायन्स-पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी 'विज्ञान प्रसार कार्यक्रम' आयोजित केला.

### जीएमआरटी, खोडद, नारायणगाव, पुणे येथे औद्योगिक भेट

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन विद्यार्थी विकास कार्यक्रमांतर्गत आणि अँटेना आणि मायक्रोवेव्ह सिद्धांत, फायबर ऑप्टिक्स आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक्स सारख्या मुख्य अभ्यासक्रमांचा भाग म्हणून या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विभागातील ३ प्राध्यापकांसह तृतीय आणि अंतिम वर्षातील एकूण २८ विद्यार्थ्यांनी जीएमआरटीला भेट दिली. सदर कार्यक्रमाचे समन्वय प्रा. आर. के. पाटील यांनी केले.

दि. ८ मार्च रोजी हायब्रिड पद्धतीने लिंग समानता आणि महिला सक्षमीकरणावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन झाले. सुश्री पावला कुसा (वाणिज्य संचालक, सोमा अभियांत्रिकी, चेक प्रजासत्ताक) यांनी परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून सन्मानित केले. उद्‌घाटन प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, महाविद्यालयाचे संचालक श्री. सुनील रेडेकर व प्रा. आर. जी. कडुसकर आणि प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने दि ८ आणि ९ मार्च २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ५ वी आंतरराष्ट्रीय परिषद (आयसीजीईडब्ल्यूई २०२५) यशस्वीरित्या आयोजित केली. या परिषदेला सहभागींकडून खूप चांगला प्रतिसाद मिळाला. २ आंतरराष्ट्रीय पेपर्ससह एकूण ७० पेपर्स सादर झाले. त्यापैकी ५८ इंग्रजीमध्ये होते आणि १२ पेपर्स प्रादेशिक भाषेत होते (११ मराठी आणि १ हिंदी). आरोग्य, अर्थव्यवस्था, नेतृत्व, सायबर सुरक्षा आणि महिलांचे सामाजिक योगदान इत्यादी विविध क्षेत्रांवर आधारित पेपर सादरीकरणासाठी एकूण ८ वेगवेगळ्या सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक सत्राचा समारोप एका सर्वोत्तम पेपर पुरस्काराने करण्यात आला.

या परिषदेचे संयोजक म्हणून विभाग प्रमुख डॉ. पी. जी. शेटे, सह-संयोजक डॉ. गीता शिंदे, डॉ. के. जे. कुलकर्णी, प्रा. व्ही. सोवणी, प्रा. एस. व्ही. योगी हे होते.

दि. ८ फेब्रुवारी २५ रोजी एनएसडीसी व्हीएलएसआय डिझाईन इंजिनिअर इंटर्नशिप अंतर्गत VIIT महाविद्यालयातील ६० विद्यार्थ्यांसाठी कॅडेन्स टूल वापरून ASIC डिझाइनवर प्रत्यक्ष प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. डॉ. केतन राऊत यांनी

सत्राचे संचालन केले. या सत्राचे समन्वयक प्रा. व्ही. यू. गोंगणे, पी. एस. देशपांडे हे होते.

CADCAMGURU सोल्यूशन अँड प्रायव्हेट लिमिटेड ऑटोमेशन आणि IoT लॅब्सना संस्थेच्या इनोव्हेशन कौन्सिल (IIC) आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभागांतर्गत बुधवार दि. १९ मार्च २०२५ रोजी दुपारी ३.०० ते ५.३० पर्यंत स्टुडंट्ससाठी भेटीची व्यवस्था करण्यात आली होती. ऑटोमेशन आणि IoT लॅबला भेट देणे हा विद्यार्थ्यांसाठी माहितीपूर्ण आणि समृद्ध करणारा अनुभव होता. याने इंडस्ट्री ४.० शी संबंधित संकल्पना आणि ॲप्लिकेशन्सची सर्वसमावेशक माहिती दिली. PLC, SCADA आणि HMI वरील व्यावहारिक सत्रांमध्ये भाग घेऊन आणि IoT लॅबचे अन्वेषण करून, विद्यार्थी सैद्धांतिक ज्ञानाला वास्तविक-जगातील औद्योगिक पद्धतींशी जोडण्यात सक्षम झाले. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या एक्सपोजरमुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक ऑटोमेशन आणि IoT क्षेत्राचा अधिक शोध घेण्यास प्रेरणा मिळाली कारण ते या उच्च मागणी असलेल्या क्षेत्रांमध्ये भविष्यातील करिअरची तयारी करतात.

महिला सक्षमीकरण उपक्रमांसाठी १२ लाख रुपयांच्या देणगीबद्दल एटीए फ्रेट लाईन प्रायव्हेट लिमिटेडचे मा. अधिकारी श्री. एरहुन कनाट, तुर्कीये ग्लोबल कार्यालयाचे श्री. संदीप सहस्त्रबुद्धे अकाउंट हेड, श्री. मनोज कलमकर, सीए यांचा सत्कार प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारांबळे यांच्या हस्ते शनिवार दि. २२ मार्च २०२५ रोजी करण्यात आला. सदर देणगी रक्कमे मधून सीएसआर अंतर्गत पुढील कामे पूर्ण झाली आहेत.

१. मुक्तांगण शाळेच्या कॅम्पसमधील महिलांसाठी शौचालयाचे नूतनीकरण, मुलींच्या कॉमन रूम क्रमांक ३०६ चे नूतनीकरण आणि फर्निचर, सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन खरेदी खर्च रु. ६,३५,८७४/-

२. महाविद्यालयाच्या प्रशासकीय कार्यालयाजवळ महिलांसाठी आउटडोअर जिम रु. १,९२,८३९/-

३. ७ गरीब आणि गरजू मुलींना गेट आणि एमपीएससी/यूपीएससीसाठी रु. १,१५,८०७ ची शिष्यवृत्ती

४. बॅडमिंटन खेळाडूंना व टेबल टेनिस सुविधासाठी रु. ८४,४९८ चे प्रायोजकत्व

५. १५ गरीब आणि गरजू मुलींना रु. १,९०,०००/- चे पोषण सहाय्य सीएसआर उपक्रमाचे समन्वय डॉ. वाय. बी. ठाकरे आणि ई अँड टीसी विभागाचे श्री. एस. एस. मोहोळ यांनी केले. डॉ. एन. बन्ने आणि श्री. सी. खंडागळे यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. डॉ. वाय. बी. ठाकरे यांनी सर्वांचे आभार मानले.

## मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग

विभागात बोर्ड ऑफ स्टडीज ची बैठक दि. १५ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी 'द सॉल्ट सिस्टम' चे सिनियर मॅनेजर श्री. आशिष कुलकर्णी, थायसन ग्रुप चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. रघुनाथ देशपांडे, ARAI चे उपसंचालक डॉ. सुशील रामदासी, व्ही आय टी पुणे येथील वरिष्ठ शिक्षक डॉ. गणेश डोंगरे, सिंबॉयसिस पुणे येथील विभागप्रमुख डॉ. अनिर्बन सूर व आय. आय. टी. मुंबई येथील यांत्रिकी विभागातील प्राध्यापक डॉ. राकेश मोरे यांना आमंत्रित करण्यात आले होते. या बैठकीचे आयोजन यांत्रिकी विभागाच्या डॉ. आर. एल. एदलाबादकर, डॉ. एन. जी. जैस्वाल, डॉ पी. जी. कुलकर्णी, श्री. एम. एम. कांबळे व श्रीमती एम. सी. शेटे यांनी केले, तसेच विभागप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर यांचे मार्गदर्शन लाभले. यांत्रिकी विभागात दि. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे प्रोजेक्ट रिव्ह्यू आयोजित करण्यात आले. हे रिव्ह्यू घेण्याकरिता विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना बोलावण्यात आले होते. संपूर्ण रिव्ह्यू चे आयोजन प्रा. श्री. ए. पी. काळदाते यांनी केले.

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

विद्युत विभागातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचे इंटर्नशिपचे मूल्यमापन शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आले. विभागातील माजी विद्यार्थी केतक कटारिया, अमृता आमडेकर, दुर्गेश विभांडीक आणि विनायक शिंदे यांनी यासाठी मोलाचे सहकार्य केले. प्रा. डॉ. सुनील गायकवाड यांनी सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले.

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी एक दिवसाची ड्रोन टेक्नॉलॉजी या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. संगणक विभागातील प्राध्यापक डॉ. वैभव खटावकर यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी शनिवार दि. २२ मार्च २०२५ रोजी EESA तर्फे पायथन प्रोग्रामिंग या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. विभागातील तृतीय वर्षातील विद्यार्थी कु. सुजय जावरकर आणि कु. प्रणव वानखडे यांनी ही कार्यशाळा घेतली.

## कॉम्प्युटर इंजिनिअरिंग

संगणक अभियांत्रिकी विभागाच्या ACES टीमने दि. २२ आणि २३ मार्च २०२५ रोजी आयोजित २४ तासांच्या हॅकेथॉन इनोव्हर्स हॅकफेस्ट २०२५ चे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील ५१ संघांचा प्रभावी सहभाग होता. पहिल्या दिवशी, प्राथमिक फेरीतील समस्या विधानांवर चर्चा करून ८ मार्गदर्शकांनी संघांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी ८ न्यायाधीशांनी अंतिम फेरीतील संघांचे मूल्यांकन केले. हा कार्यक्रम सर्जनशीलता, नावीन्य आणि उत्साहाचे एक रोमांचक प्रदर्शन होता. या कार्यक्रमासाठी प्रायोजक असलेले एलिट, पिक्टेलएआय, डीएओएसट्रीट, इनोप्लेक्सस, स्टार कॉपियर्स आणि स्मार्ट कुकी यांचे आभार. हॅकेथॉनमधील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांनी अनुक्रमे रु. ३३,०००/-, रु. २१,०००/- आणि रु. ११,०००/- रुपयांचे पहिले, दुसरे आणि तिसरे बक्षीस जिंकले.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स अ‍ॅण्ड डेटा सायन्स

जानेवारी महिन्यात Aspire तर्फे AIBIA (Artificial Intelligence and Business Intelligence Analyst) हा इंटर्नशिप कोर्स सुरू करण्यात आला. प्रोफेसर विजयालक्ष्मी कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या skill trainers नी विद्यार्थ्यांसाठी विविध विषयावर सेशन्स घेतली. एआयडिएस आणि आयटी विभागातील सुमारे ५५ मुलांनी १५० तासांच्या कोर्स मधील जवळ-जवळ १३५ तास पूर्ण केले. डिपार्टमेंटच्या विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे यांना डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीरिंग, आकुर्डी येथे NVidia च्या डीप लर्निंग सेशन साठी आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यशाळेत सुमारे ८० विद्यार्थ्यांनी सर्टिफिकेशन पूर्ण केले.

दि. १० जानेवारी २०२५ रोजी द्वितीय, तृतीय आणि अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी पालकसभा आयोजित करण्यात आली होती. या सभेस सुमारे ४० पालक उपस्थित होते. श्री. प्रसाद कुलकर्णी व श्री. पंकज बढे या पालकांचा कॉलेजच्या प्रगती मधील ''विशेष सहभागा'' बद्दल सत्कार करण्यात आला.

प्लेसमेंट साठी विशेष मार्गदर्शन व्हावे यासाठी Innoplexus कंपनी मधील तीर्थांकर सेन व यश या डेटा इंजिनिअर्सनी मॉक इंटरव्ह्यू घेतले.

फेब्रुवारी महिन्यात कु. अन्वी कोरे या विद्यार्थिनीने COEP ZEST २०२५ येथे बॅडमिंटन मिक्स डबल्स मध्ये द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.

विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे यांना Springer Nature या सुप्रसिद्ध जर्नल तर्फे ''Scientific Reports'' साठी ''Reviewer Recognition'' मिळाले. विविध transaction Journals साठी सुद्धा त्यांनी Reviewer म्हणून काम केले.

कु. यश जागेकर या विद्यार्थ्याची Dai - Ichi - या जपानी कंपनी मध्ये निवड झाली असून त्याला सुमारे रु. २६ लाखांचे पॅकेज मिळाले आहे.

प्रा. मृणाल बुचडे यांनी वोडाफोन इंटेलिजेंट सोल्युशन्स आणि कनेक्टिंग ड्रीम्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एससीटीआरच्या पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, विभागातर्फे दि. २५ ते ३० जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित केलेल्या शिक्षणातील जनरेटिव्ह एआय वरील फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे सर्टिफिकेट मिळवले.

प्रा. श्रुती शिरीष देशपांडे यांनी देखील अंजुमन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट तर्फे आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम चे सर्टिफिकेट मिळवले. विभागाच्या प्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे यांनी Udemy या ऑनलाईन प्लॅटफॉर्म वरून Patent Agent Exam Training पूर्ण केले.

दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी विभागाच्या आणि ASPIRE च्या संयुक्त विद्यमाने NSDC चा AIBIA (Artificial Intelligence and Business Intelligence Analyst) हा १७० तासांचा कोर्स विद्यार्थ्यांनी पूर्ण केला. सुमारे ८ वेगवेगळे प्रशिक्षक, २८ एआयडीएस, १६ आयटी, १४ कॉम्प्युटर आणि २ इ ॲण्ड टी सी असे एकूण ६० विद्यार्थ्यांच्या सहभागाने हा इंटर्नशिप प्रोग्रॅम यशस्वीरीत्या पार पडला. प्रा. विजयालक्ष्मी कानडे यांनी या इंटर्नशिपचे कोऑर्डिनेशन केले.

## फर्स्ट इयर इंजिनिअरिंग विभाग

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, ''अग्निसुरक्षेच्या मूलभूत गोष्टी'' अंतर्गत, सेमिस्टर-२ साठी या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी शनिवार दि. १ मार्च २०२५ रोजी प्रो. शेळके यांनी औद्योगिक सुरक्षा व्यवस्थापन (विद्युत, यांत्रिक, सागरी, कृषी सुरक्षा) या विषयावर ओरिएंटेशन सत्र आयोजित केले होते. प्रो. पांडा (कोर्स समन्वयक) यांनी विविध क्षेत्रातील विविध अपघातांचे स्पष्टीकरण दिले. प्रो. पवन जाधव यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची रूपरेषा सादर केली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत, सेमिस्टर-२ साठी ''कायदेशीर आव्हानांना नेव्हिगेट करणे आणि कामाच्या आयुष्यातील संतुलन राखणे'' या विषयावर कार्य जीवन संतुलन, या अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाच्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी समुपदेशक डॉ. रेषा अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली, ८ मार्च २०२५ रोजी, शनिवारी पुण्यातील फौजदारी वकील ॲड. वाजेद खान यांचे एक सत्र आयोजित केले. त्यांनी कायदेशीर व्यवसायातील आव्हाने आणि बक्षिसे याबद्दल मौल्यवान माहिती दिली. त्यांनी कार्य-जीवन नैतिक युक्त्या आणि प्रभावी केस व्यवस्थापनावर भर दिला.

## एमबीए विभाग

दि. १९ मार्च २०२५ रोजी एक अर्थसंकल्पीय सत्र आयोजित केले होते. या सत्रात २०२५ च्या अर्थसंकल्पीय सत्रातील प्रमुख निष्कर्षांची रूपरेषा दिली आहे. विशेषतः विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी होणाऱ्या परिणामांवर लक्ष केंद्रित केले आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितीने या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान घेतलेल्या प्रमुख निर्णयांवर प्रभाव पाडला आहे आणि येत्या आर्थिक वर्षात शैक्षणिक क्षेत्रावर लक्षणीय परिणाम होईल. दि. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी डू सेव्ह फाउंडेशनच्या सहकार्याने ''स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनातील सामाजिक जबाबदारी आणि करिअर संधी'' या विषयावर ऑडिओ-व्हिज्युअल सत्र यशस्वीरित्या आयोजित केले. या सत्राचा उद्देश पर्यावरणीय आव्हाने आणि करिअरच्या शक्यतांमधील अंतर भरून काढणे हा होता. ज्यामुळे प्रभावी कचरा व्यवस्थापनात व्यक्ती आणि संस्थांची भूमिका दर्शविण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना शाश्वतता-संबंधित क्षेत्रात उद्योजकता आणि व्यावसायिक भूमिकांचा विचार करण्यास प्रोत्साहित करणे हा देखील या सत्राचा उद्देश होता.

***

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

### ४८ वा वर्धापन दिन

दि. ४ मार्च २०२५ रोजी घाटकोपर शाखेचा ४८ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेत गणेश पूजनाचे आयोजन करण्यात आले. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष श्री. के. एन. शिरकांडे, माजी विद्यार्थी मंडळ मुंबई विभाग पदाधिकारी तसेच माजी विद्यार्थी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. संस्थेचे हितचिंतक श्री. गिरीश जोशी व सौ. रेवा जोशी यांच्या हस्ते गणेशपूजन करण्यात आले. याप्रसंगी हितचिंतक, पालक, विद्यार्थी यांच्या तर्फे विविध माध्यमातून शाळेच्या वृद्धीसाठी अनेक शुभेच्छा प्राप्त झाल्या. या कार्यक्रमाची सांगता चहापानाने झाली. शाळेच्या ४८ व्या वर्धापन दिनानिमित्त शाळा विद्युत रोषणाईने सजविण्यात आली होती.

### जागतिक जल दिवस उत्साहास साजरा

शनिवार दि. २२ मार्च २०२५ जागतिक जल दिवसानिमित्त विद्याभवन संकुलात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री. अ. पां. देशपांडे (मराठी विज्ञान परिषद कार्यवाह) आणि श्री. उल्हास परांजपे (सिव्हिल इंजिनिअर) हे लाभले होते. श्रीमती योगिनी पोतदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्रीमती सरला नरेंद्रन यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. श्री. देशपांडे यांनी आपल्या मार्गदर्शनात 'पाणी' हा आपल्या सर्वांच्या आयुष्यातील महत्त्वाचा घटक कसा आहे, हे विविध उदाहरणातून स्पष्ट केले. पावसाचे ९७% पाणी समुद्रात जाऊन मिळते. उरलेल्या ३% पैकी २% पाण्याचे हिमनग तयार होतात व १% पाणी आपल्या वापरासाठी असते. ते शेती, उद्योगधंदे, दैनंदिन वापरासाठी वापरण्यात येते. तसेच पाण्याचे चक्र समजावून दिले. पाण्याचा काटकसरीने वापर कसा करावा हेही समजावून दिले. श्री. उल्हास परांजपे हे सिव्हिल इंजिनिअर असून त्यांनी आत्तापर्यंत पाणी साठविण्याच्या १०००० क्षमतेच्या ४०० टाक्या समाजासाठी बांधून दिल्या आहेत. ते अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांशी संवादातून सांगितले आणि आपणही असे लहान लहान प्रयत्न केले तर त्याचा उपयोग सर्वांना होऊ शकेल तसेच नद्यांचे रूंदीकरण व खोली करण करण्याचे फायदे सांगितले. या प्रसंगी इ. ८वी चे मराठी व इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कु. आर्या हांडे या विद्यार्थिनीने सर्वांचे आभार मानले.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ

पूर्व-प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाच्या समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव, तसेच पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया यांच्या उपस्थितीत क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. धावण्याची शर्यत, चेंडू शर्यत, पाण्याची शर्यत, अडथळ्यांची शर्यत आणि मल्टी टास्क शर्यत यांसारख्या विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १८० हून अधिक विद्यार्थ्यांना पदकांनी सन्मानित करण्यात आले.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

### शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा

मंगळवार दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत शिवजयंती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी शिवप्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. रितू गायकवाड व कु. साई दिघे इ. ४थी यांनी केले. इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांतून, नृत्यातून शिवरायांच्या जीवनावर आधारित कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी शिवरायांवर आधारित गाणी, पोवाडे व नृत्य सादर केले. ढाल, तलावारीची प्रात्याक्षिके विद्यार्थ्यांनी सादर केली. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी शिवगर्जना सादर केली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व बक्षिस प्राप्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. श्रीमती वाघमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### मराठी राजभाषा दिन

दि. २७ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ कविवर्य वि. वा. शिरवाडकर यांचा जन्म दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. इ. १०वी बोर्ड परीक्षेमुळे विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत राजभाषा दिन शनिवार दि. १ मार्च २०२५ रोजी साजरा करण्यात आला. ज्येष्ठ शिक्षक श्री. मनोहर डाफळे यांनी कविवर्य वि. वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. श्रीमती सावंत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी मराठी राजभाषा दिनानिमित्त विविध कार्यक्रम सादर केले. मराठी राजभाषा दिनाची माहिती, कुसुमाग्रजांच्या कविता, भाषणे, गाणी व नृत्याविष्काराने मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. शेवटी श्रीमती सावंत यांनी सर्वांचे आभार मानले.

### जागतिक महिला दिन

शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत माजी विद्यार्थी मंडळ आयोजित चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेतील इ. १ली ते ४थी चे १५ पालक स्पर्धेत सहभागी झाले. स्पर्धेत विजयी पालकांचा मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी पारितोषिक देऊन सन्मान केला. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी महिला दिनानिमित्त पालकांना मार्गदर्शन केले.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### शिवजयंती

शनिवार दि. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी विभागात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. इ. ४थी तील (अ, ब, क) मधील एकूण २३५ विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले आणि त्यांनी आपल्या शानदार अभिनयाने संपूर्ण वातावरण शिवमय केले.

कार्यक्रमामध्ये नाट्यप्रयोग, पोवाडा, अभिनय आणि नृत्य यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अप्रतिम सादरीकरण केले. इ.३री चे विद्यार्थी प्रेक्षक म्हणून उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते राज्यभिषेक सोहळ्यापर्यंतचा संपूर्ण इतिहास ४थी च्या विद्यार्थ्यांनी नाट्यरूपाने सादर केला. शिवाजी महाराजांचा जन्म, स्वराज्याची शपथ, अफझल खान भेट, बाजी प्रभू आणि पावन खिंडीची अविस्मरणीय लढाई, आग्र्याहून सुटका यांसारख्या ऐतिहासिक क्षणांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी हा देखणा कार्यक्रम उत्कृष्टरीत्या साकारला. विद्यार्थ्यांची मावळे, मोगल सैनिक, शिवाजी महाराज, संभाजी महाराज, तानाजी मालुसरे, बाजी प्रभू, राजमाता जिजाबाई यांच्या वेशभूषा आणि अभिनयाने कार्यक्रम लक्षणीय ठरला. विद्यार्थ्यांनी 'इतिहास जिवंत केला!'

हा सोहळा केवळ एक साजरा करण्यापुरता मर्यादित राहिला नाही, तर या सोहळ्याने विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, नेतृत्व आणि देशभक्तीचे प्रेरणादायी विचार रुजवले.या उत्सवाने छत्रपती शिवाजी महाराजांना खरी मानवंदना अर्पण केली आणि नव्या पिढीला त्यांच्या विचारांशी जोडले.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी संपूर्ण प्राथमिक इंग्रजी विभागाचे कौतुक केले व आपली संस्कृती आणि इतिहास असाच अभिमानाने जपला गेला पाहिजे असे मत प्रकट केले.

**पँगाँग लेकवर हाफ मॅरेथॉन पूर्ण केले - विद्याभवन च्या शिक्षकाचे यश**

लडाखमधील समुद्रसपाटीपासून सुमारे १४,२७० फूट उंचीवर वसलेल्या पँगाँग लेकच्या गोठलेल्या पृष्ठभागावर दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी असोसिएशन स्पोर्ट फेडरेशन ऑफ लडाख (ए.एस.एफ.एल.) व भारतीय सेना यांनी आयोजित केलेली हाफ मॅरेथॉन २१ किमी यशस्वीरीत्या पूर्ण करून श्री. दीपक रंगनाथ निचित, सहाय्यक शिक्षक, विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभाग, घाटकोपर, मुंबई यांनी एक उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अत्यंत कमी तापमान (उणे ३० अंश), कडक थंडी आणि कमी ऑक्सिजन अशा कठीण परिस्थितीतही त्यांनी २१.०४ कि. मी. चे अंतर ३ तास ३४ मिनिटांत पूर्ण करून महाराष्ट्राचे नाव उंचावले.

'पँगाँग लेक' हे जगातील सर्वात उंचावर वसलेले गोठलेले सरोवर म्हणून ओळखले जाते. इथे हिवाळ्यात तापमान उणे ३० अंश सेल्सियसपर्यंत खाली जाते. त्यामुळे अशा थंडीत धावणे हे धावपटूंसाठी मोठे आव्हान असते. श्री. दीपक निचित यांनी चिकाटी, आत्मविश्वास आणि कठोर प्रशिक्षणाच्या बळावर ही मॅरेथॉन पूर्ण केली. हा संपूर्ण उपक्रम लडाख प्रशासन भारतीय सेना आणि विविध संस्थांच्या सहकार्याने पार पडला. या यशाबद्दल श्री. निचित यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. उच्च उंचीवरील कमी ऑक्सिजन, गोठलेले पाणी आणि अनियमित हवामान अशा प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेल्या या विजयाने अनेक युवा धावपटूंना प्रेरणा मिळेल, अशी भावना क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

**आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात संपन्न**

विभागात आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने माता-पालकांसाठी कोलाज स्पर्धा आयोजित केली. त्यासाठी महिला सक्षमीकरण ही थीम होती. स्पर्धेत सहभागी मातांनी आपल्या कलेद्वारे कोलाज निर्मिती केली. त्यायोगे उपस्थितांना बोधपर प्रेरणा मिळाली. सर्व सहभागींना पुस्तके देण्यात आली आणि विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**शिवजयंती**

मंगळवार दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रशालेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

इ. ५वी व इ. ८वी च्या विद्यार्थ्यांनी शिवरायांचा पाळणा, पोवाडा, शिवरायांवरील गाणी, माहिती व शिवगर्जना असे विविध कार्यक्रम सादर केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. ८वी च्या विद्यार्थिनी कु. वैदेही गुरव व कु. क्रांती नरवडे यांनी केले तर कु. ध्रुवी गुरव ने सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई व इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील व मराठी माध्यमिक विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

**मराठी राजभाषा गौरव दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी कविवर्य वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिनानिमित्त प्रशालेतील अप्पासाहेब गरगटे सभागृहात मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

त्यानंतर इ. ६वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी, शांता शेळके व कवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांच्या कवितांचे वाचन व काव्य गायन सादर केले. तसेच मराठी भाषेचे महत्त्व सांगितले. शिक्षिका श्रीमती रश्मी तळेकर यांनी काव्यवाचन कसे करावे हे समजवण्यासाठी ग. दि. माडगूळकर यांची 'सांगा कसे जगायचे' या कवितेचे वाचन सादर केले.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी साध्या व सोप्या भाषेत कवी कवयित्री यांची माहिती सांगितली. तसेच आपल्या मातृभाषेचा आणि इतर भाषेचा आदर करावा. हस्ताक्षर सुधारण्याकडे लक्ष द्यावे. भाषा कशी समृद्ध करावी याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. संस्कृती सरगर व आभार प्रदर्शन कु. आसावरी पाटील या इ. ७वी च्या विद्यार्थिनींनी केले.

### राष्ट्रीय विज्ञान दिवस

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी अप्पासाहेब गरगटे सभागृहात राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रामण यांच्या सन्मानार्थ साजरा करण्यात आला. इ. ७वी आणि ८वी तील विद्यार्थ्यांनी विज्ञानाच्या सुबक आकृत्यांचे रेखाटन केले. या प्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, तसेच इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर व समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन उपस्थित होत्या.

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनील भालचंद्र पाटील**

### मराठी राजभाषा गौरव दिन

विद्याभवन हायस्कूल नं. २, इंग्रजी विभागाच्या मराठी वाङ्मय मंडळांतर्गत 'मराठी राजभाषा गौरव दिन' दि. २७.२.२०२५ रोजी सेमिनार हॉलमध्ये मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. सदर कार्यक्रमाला कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयक श्रीमती सरला नरेंद्रन तसेच शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक वि. वा. शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांच्या विषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांचे कौतुक केले, आणि मंडळामार्फत अशा विविध कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, अधिकाधिक विद्यार्थी कार्यक्रमात सहभाग घेतात, म्हणून अशी मंडळे शाळेत असणे आवश्यक आहे असे सांगितले. तसेच मराठी वाङ्मय मंडळ आणि सर्व मराठी विषय शिक्षकांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव गीत, नाटक, महाराष्ट्राची लोकधारा, अभंग, भाषणे व काव्यसंमेलनाद्वारे मराठी भाषेचा गोडवा विविध कार्यक्रमातून सादर केला.

मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलागुणांचे कौतुक केले. मराठीतील क्रियापद वापरताना होणारी गंमत सांगितली. मराठी भाषेचे भविष्य उज्ज्वल असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख श्रीमती मीना गायकवाड आणि सर्व मराठी विषय शिक्षकांनी अथक

प्रयत्न घेवून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

**जागतिक महिला दिन**

शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी प्रशालेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात विद्याभवन नं. १ (सेमी इंग्रजी) व विद्याभवन नं. २ (इंग्रजी) माध्यम तसेच माजी विद्यार्थी मंडळ मुंबई शाखेच्या सहकार्याने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महिलादिनानिमित्त सेमी इंग्रजी माध्यमाच्या महिला पालकांची ताज्या हिरव्या वटाण्याचे विविध पदार्थ करण्याची स्पर्धा घेण्यात आली. तसेच इंग्रजी माध्यमातर्फे पालकांसाठी पोहे आणि रवा यापासूनच्या पाककृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सेमी इंग्रजी माध्यमाचे ३० व इंग्रजी माध्यमाचे एकूण ३६ पालक या स्पर्धेत सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे परिक्षण हॉटेल मॅनजमेंट पदवीधर व प्रशालेचे माजी विद्यार्थी श्री. ज्ञानेश्वर साठे आणि शिक्षक श्री. रूपेश मांडवेकर व श्री. सुहास गरदडे यांनी केले.

महिला पालक वर्गाचे स्वागत गुलाबपुष्प व पुस्तक देऊन करण्यात आले.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी महिलांना, महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्पर्धक महिलांचे कौतुक केले. चहापानानंतर आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. स्पर्धेतील विजयी पालक पुढीलप्रमाणेः

**विद्याभवन नं. १ (सेमी इंग्रजी)**

| **पालकांचे नाव** | **क्रमांक** |
|---|---|
| श्रीमती अर्चना रघुनाथ चाबुकस्वार | प्रथम |
| श्रीमती मयुरी किशोर सुर्गीरे | द्वितीय |
| श्रीमती गीता राजेंद्र काळे | द्वितीय |
| श्रीमती शीतल तुषार तोत्रे | तृतीय |
| श्रीमती धनश्री विशाल ननवरे | तृतीय |

**विद्याभवन नं. २ (इंग्रजी)**

| | |
|---|---|
| श्रीमती गायत्री अंकुश राकुई | प्रथम |
| श्रीमती निशा गणेश भुजबळ | द्वितीय |
| श्रीमती रुपाली सुनील शिंदे | तृतीय |
| श्रीमती वृषाली किरण तळगावकर | उत्तेजनार्थ |
| श्रीमती रोहिणी दयानंद सुतार | उत्तेजनार्थ |
| श्रीमती मीनल प्रसाद वेदक | उत्तेजनार्थ |

*


**संस्थेस देणगी पाठविण्यासंबंधीची माहिती**

**या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार आयकरात ५०% सवलत मिळते.**

**The details of our bank account are as follows :**

| | |
|---|---|
| Bank A/c Name | : **Pune Vidyarthi Griha** |
| Bank Name | : **Bank of Baroda** |
| Branch | : **Sadashiv Peth, Pune 411030** |
| Saving A/c No. | : **04500100009842** |
| RTGS/NEFT/ IFSC CODE | : **BARB0SADASH**<br>**The fifth character is numeric 'zero'.** |
| Swift Code | : **BARBIN BBPCB** |
| MICR Code | : **411012009** |

बँकेमध्ये देणगी पाठविल्यानंतर रकमेव्यतिरिक्त नाव, पत्ता असा कोणताही संदर्भ संस्थेस प्राप्त होत नाही त्यामुळे कृपया आपण वरील खात्यावर देणगी पाठविल्यानंतर खालील फोन नं. वर किंवा ई मेलवर सविस्तर माहितीसाठी संपर्क करून कळवावे. फोन नं. - ०२० २४४७०९२७, २४४७०५७३ ई मेल : pvgheadoffice@gmail.com

## ✽ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✽



मल्टी टास्क शर्यतीत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांसमवेत पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया



धावण्याच्या शर्यतीत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांसमवेत समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव



शिवजयंती निमित्त पोवाडा सादर करताना प्राथमिक मराठी विभागातील इ. ४चे विद्यार्थी



मराठी राजभाषा दिनानिमित्त गाणे सादर करताना प्राथमिक मराठी विभागातील इ. ३ री च्या विद्यार्थिनी



शिवजयंतीनिमित्त कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्राथमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांसमवेत उपस्थित असलेला शिक्षक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



'ॲसोसिएशन स्पोर्ट फेडरेशन ऑफ लडाख' व 'भारतीय सेना' यांनी आयोजित केलेली हाफ मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण केलेले प्राथमिक इंग्रजी विभागाचे सहा. शिक्षक श्री. दीपक निचित




→ महिला दिनानिमित्त झालेल्या स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना बक्षिसे देताना मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत



महिला दिनानिमित्त झालेल्या स्पर्धेतील विजयी स्पर्धकांसमवेत मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर व इतर सहकारी शिक्षक



मराठी राजभाषा गौरव दिन कार्यक्रमप्रसंगी सहभागी विद्यार्थी, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका, समन्वयिका व शिक्षक वर्ग

# नेरूळ शाखा, नवी मुंबई

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**मोफत नेत्र तपासणी शिबीर**

दि. ४ ते ८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत प्राथमिक मराठी व प्राथमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. पल्लवी अग्रवाल यांच्यातर्फे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. ऑप्टोमेट्रिस्ट संतोष लोखंडे, लता सोनावणे, प्रज्ञा कांबळे व ऑप्टिशियन राजेंद्र सुतार यांच्या पथकाने इ. १ली ते इ.७वीच्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी केली. विद्यार्थ्यांच्या नेत्र समस्या, त्यांचे प्रश्न याविषयी मार्गदर्शन केले. डोळ्यांची काळजी घ्या. स्क्रीन टाईम कमी करा. हिरव्या भाज्या खा असे मार्गदर्शन केले. तसेच गरजू विद्यार्थ्यांना मोफत चष्मा वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केल्याबद्दल डॉ. पल्लवी अग्रवाल यांचे संस्थेच्या वतीने मन:पूर्वक आभार!

**क्षेत्रभेट**

दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ३री ते ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबई महानगरपालिका निर्मित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली या ठिकाणी विद्यार्थ्यांनी भेट दिली. ऐतिहासिक वास्तूंचे जतन, संवर्धन, निरीक्षण या सर्व गोष्टींचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. या वास्तूतील ध्यान-साधना केंद्रात ध्यान धारणेचा अनुभव घेतला. तेथील शांतता अनुभवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संपूर्ण जीवनपट चित्ररूपात विद्यार्थ्यांना बघता आला. त्यांच्या महान कार्याबद्दल एक चित्रफित दाखविण्यात आली. तेथील ग्रंथालयातील अनेक पुस्तके विद्यार्थ्यांनी हाताळली. संविधानाची प्रत विद्यार्थ्यांना पाहता आली. हे सर्व पाहून झाल्यावर विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. जे तिथे पाहिले, वाचले त्यावर आधारित ही स्पर्धा होती. विद्यार्थ्यांनी सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे दिल्यामुळे शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची भेट देण्यात आली.

**ॲबॅकस सुयश**

21st State and Zonal Mumbai आयोजित ॲबॅकस व मेंटल ॲरिथमॅटिक २०२५ या परीक्षेत अनेक विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त मेरीट |
|---|---|
| कु. आर्यन आशिष गोळे | चॅम्पियन ट्रॉफी (नवी मुंबई) |
| कु. स्वरा किशोर जाधव | मेरिट (नवी मुंबई) |
| कु. काव्या किरण जाधव | स्टेट मेरिट |
| कु. प्रज्ञा विलास गायकर | मेरिट (नवी मुंबई) |
| कु. आदिती बापूराव खुळे | स्टेट मेरिट, २री रनर अप |
| कु. स्वरा महेश गायकवाड | मेरिट (नवी मुंबई) |
| कु. अन्वेश किरण नरवडे | स्टेट मेरिट |
| कु. समर्थ अरुण तिकोणे | मेरिट (नवी मुंबई) |
| कु. निर्मित सहादू तोडकर | स्टेट मेरिट, चॅम्पियन (नवी मुंबई) |
| कु. अनुष्का अरुण तिकोणे | स्टेट १ली रनर अप, चॅम्पियन (नवी मुंबई) |
| कु. अनुष्का अशिष गोळे | स्टेट मेरिट, चॅम्पियन (नवी मुंबई) |
| कु. धनंजय किरण जाधव | स्टेट मेरिट,१ला रनर अप (नवी मुंबई) |
| कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ | १ली रनर अप (नवी मुंबई) |
| कु. गौरव दिलीप देठे | मेरिट (नवी मुंबई) |

**विश्वसमता आदर्श शिक्षक पुरस्कार**

विश्वसमता कलामंच, लोवले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य विचारमंच, महाराष्ट्र

यांच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतो. दि. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी याठिकाणी विश्व समता पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. **शिक्षिका श्रीमती नूतन संजय गवांदे व श्रीमती आरती किशोर औचर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना 'राज्यस्तरीय विश्वसमता आदर्श शिक्षिका' या पुरस्काराने गौरविण्यात आले.** कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व मुख्याध्यापक श्री. गोरख कदम यांनी श्रीमती नूतन गवांदे आणि श्रीमती आरती औचर यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दि. २३ जानेवारी २०२५ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत नेताजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यांना कधीही विसरू नका. स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनावर आधारित पुस्तके विकत घ्या, ती वाचा व आपले ज्ञान अधिक वाढवा असे मार्गदर्शन समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांनी विद्यार्थ्यांना केले. सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कोठे झाला? त्यांनी कोणत्या लढाऊ संघटनेची स्थापना केली? त्यांनी ब्रिटिश सरकार विरुद्ध उठाव का केला? असे प्रश्न विचारून श्री. पांडुरंग मुळीक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थी व शिक्षकांनीही याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक श्री. संकेत थळे यांनी केले.

### बालसभा

दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी यलो हाऊसच्या विद्यार्थ्यांच्या बालसभेस मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, श्रीमती सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. नटराज व गणेशाच्या प्रतिमेचे पूजन करून बालसभेस सुरूवात झाली. या बालसभेत विद्यार्थ्यांनी एकपात्री प्रयोग, धुलीवंदन, पंजाबी नृत्य, महाभारत सार, सुप्रसिध्द अभिनेते व निर्माते राजकपूर यांच्या चित्रपटातील गाण्यांवर आधारित नृत्याचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ओनीयल कोरीमली, कु. श्रेया तिवारी व कु. अनया वऱ्हाडी या विद्यार्थ्यांनी केले.

### शुध्दलेखन व हस्ताक्षर स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या कै. श्री. श. गो. केतकर शुद्धलेखन व हस्ताक्षर स्पर्धेचे बक्षिस वितरण दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेच्या सभागृहात करण्यात आले. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. सौम्या पाटीलबुवा दगाबाज | १/अ | प्रथम |
| कु. अनन्या किरण पिंगळे | १/अ | द्वितीय |
| कु. ईश्वरी समीर सुतार | १/ब | तृतीय |
| कु. आराध्या बाबुलाल चांदोरा | २/ब | प्रथम |
| कु. प्रज्वल पद्माकर सूर्यवंशी | २/अ | द्वितीय |
| कु. ध्रुवी संदीप मेहेर | २/अ | तृतीय |
| कु. दर्शिका तरुणदत्त चौबे | ३/अ | प्रथम |
| कु. प्रीती सोमनाथ विघ्ने | ३/अ | द्वितीय |
| कु. नैतिक विष्णू माळी | ३/ब | तृतीय |
| कु. धीरज योगेश गुरव | ४/अ | प्रथम |
| कु. अभिराज रमेश पानसरे | ४/ब | द्वितीय |
| कु. सिद्धी प्रशांत भोसले | ४/ब | तृतीय |

# विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापक : श्री. गोरख कदम**

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात साजरा

दि. २१ जानेवारी २०२५ रोजी विद्याभवन माध्यमिक मराठी व उच्च माध्यमिक विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेचे समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री. किसनराव पलांडे हे उपस्थित होते. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, समाजसेवक देवाप्पा लवटे, सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक श्री. मोहन पाटील, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम व इतर मान्यवर उपस्थित होते. प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून तसेच श्रीगणेश, देवी सरस्वती, कुलगुरू दादासाहेब केतकर व गुरूवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. विद्यार्थिनींनी सुमधुर आवाजात ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. इ. १०वी व १२वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. शिष्यवृत्ती परीक्षा, विविध सहशालेय व आंतरशालेय स्पर्धा व क्रीडा स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या विजेत्यांचा गौरव प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४-२५चा चित्ररूपी वार्षिक अहवाल सादर करण्यात आला. प्रमुख अतिथी श्री. किसनराव पलांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या आवडीचे क्षेत्र निवडण्याचा सल्ला दिला व सोशल मिडियाचा मर्यादित वापर, चांगली संगत, शिस्त, वेळेचे नियोजन व कठोर परिश्रम केल्यास यश नक्की मिळते असे विचार मांडले. इ. १०वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षापूर्व तयारीसाठी विषयतज्ज्ञ मार्गदर्शन, तसेच व्यवसाय मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन देखील महानगरपालिकेतर्फे केले जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. सर्व विभागांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, समन्वयक व शिक्षक याप्रसंगी उपस्थित होते. श्रीमती अश्विनी चौधरी यांनी सूत्रसंचालन तर श्रीमती प्रीती वाघ यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता वन्दे मातरम्ने झाली.

### इ. १२वी सदिच्छा समारंभ

माहे फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या वाणिज्य व विज्ञान शाखेतील इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ दि. २४ जानेवारी २०२५ रोजी पार पडला. याप्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती शोभा लवटे इ. उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेविषयी व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. वर्गशिक्षक श्रीमती प्रीती वाघ व श्रीमती अश्विनी चौधरी यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे व अभ्यासाचे नियोजन करण्याचा सल्ला देऊन येणाऱ्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. श्री. पांडुरंग मुळीक यांनी देखील विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी मार्गदर्शन करताना यशाला शॉर्टकट नसतो, कठोर परिश्रमाला पर्याय नाही व परीक्षेदरम्यान संपूर्ण उजळणीचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी शाळेविषयी कृतज्ञता म्हणून कृतज्ञता निधी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्याकडे सुपूर्द केला. कार्यक्रमाचा शेवट वंदेमातरम् या राष्ट्रीय गीताने झाला. विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

***

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ※



कै. श्री. श. गो. केतकर शुद्धलेखन व हस्ताक्षर स्पर्धेतील बक्षीसपात्र विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक आणि शिक्षकवृंद





प्राथमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करताना 'आय वेव्ह क्लिनिक'चे वैद्यकीय कर्मचारी




बालसभेत कोळी नृत्य सादर करताना प्राथमिक इंग्रजी विभागाचे विद्यार्थी.

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ❊



जिजाऊ जयंती निमित्त भाषण करताना विद्यार्थिनी कु. उल्का राजेश झगडे इ.६वी



प्राथमिक मराठी विभागाच्या शिक्षिका श्रीमती राधिका अक्षय भोसले यांना 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' प्रदान करताना प्रमुख अतिथी श्री. किसनराव गायकवाड, विशेष अतिथी नेत्ररोग तज्ज्ञ डॉक्टर पल्लवी अग्रवाल, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ आणि मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ




श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ न्यू बॉम्बे सी साईड यांच्यातर्फे आयोजित विज्ञान प्रदर्शन Khoj ६ मध्ये प्राथमिक मराठी विभागाला प्रथम क्रमांकाचे रु. १०,०००/- रोख रक्कमेचे पारितोषिक प्राप्त झाले. पारितोषिक स्वीकारताना कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ व कु. वेदश्री विश्वनाथ राक्षे, समवेत शिक्षिका श्रीमती राधिका अक्षय भोसले



वाचन महोत्सवांतर्गत वाचन लेखन उपक्रमात जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना कु. काव्या किरण जाधव, समवेत शिक्षिका श्रीमती कविता तेंडुलकर

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ❊



राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी




बालिका दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक आणि शिक्षक वृंद




बालिका दिनानिमित्त मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी




नवी मुंबई महानगरपालिका समाज कल्याण विभाग आयोजित सावित्रीबाई फुले जयंती निमित्त घेण्यात आलेल्या निबंध लेखन स्पर्धेत अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील पवार व माजी खासदार श्री. संजीवजी नाईक यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा दिनेश मिसाळ

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### शिवजयंती

दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे होते. विद्यार्थ्यांनी शिवकालीन विविध व्यक्तींच्या वेशभूषा करून शिवछत्रपतींच्या जीवन कार्याविषयी यथोचित भाषणे केली. शिक्षक श्री. सुरेश वाघमारे यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी शिवरायांच्या अंगी असलेले विविध गुण अंगीकारण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार सौ. अर्चना गीत यांनी मानले. सूत्रसंचालन ज्ञानेश्वरी पगार या विद्यार्थिनीने केले.

### मराठी राजभाषा दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या शुभ हस्ते कविवर्य कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. इ.८वी अ च्या विद्यार्थिनींनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे गायन केले. अनेक विद्यार्थिनींनी मराठी भाषेची थोरवी सांगणारी गीते सादर केली. ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी 'मराठी भाषा : अभिजात भाषा' या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुरेश वाघमारे यांनी केले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी मातृभाषा मराठीचे सखोल अध्ययन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे आभार श्रीमती प्रीती राजपूत यांनी मानले.

### राष्ट्रीय विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. विज्ञान शिक्षक श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्याचा उद्देश व महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तसेच विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ विचार करण्याचे आवाहन त्यांनी केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी आपल्या दैनंदिन जीवनात विज्ञानातील विविध शोधांमुळे झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला

### उपकार्याध्यक्षांचा सत्कार

दि. ४ मार्च २०२५ रोजी तळेगाव शाखेचे संचालक श्री. अमोल जोशी यांची संस्थेच्या उपकार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संस्था व तळेगाव शाखेच्या वतीने कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी अतिथींचे स्वागत करून प्रास्ताविक केले. यावेळी बोलताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी नवनियुक्त उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे अभिनंदन करताना संस्थेच्या विविध शाखांच्या विकासात श्री. अमोल जोशी यांचे महत्त्वाचे योगदान व मार्गदर्शन मिळत असल्याचे आवर्जून सांगितले. तसेच विविध सामाजिक संस्थांकडून मिळालेले पुरस्कार हे श्री. अमोल जोशी यांच्या सामाजिक कार्याची साक्ष देतात असे प्रतिपादन केले. सत्काराला उत्तर देताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी सत्कारासाठी सर्वांचे आभार मानताना संस्थेत कार्य करत असताना सर्व पदाधिकारी व संचालक मंडळाचे संपूर्ण सहकार्य मिळत असते असे कृतज्ञापूर्वक सांगितले. तसेच विद्यालय, संस्था व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी केले. आभार श्री. सुकदेव निंबेकर यांनी मानले. यावेळी तळेगांव ग्रामस्थांच्या वतीने श्री. अमोल जोशी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला श्री रामदास दाते,

श्री. तुकाराम दाते, श्री. निवृत्ती पगार, श्री. ईश्वर पगार, श्री. त्र्यंबक पगार, श्री. शंकर पगार हे ग्रामस्थ उपस्थित होते.

**महिला दिन**

दि. ८ मार्च २०२५ रोजी विद्यालयात महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या हस्ते विद्यालयातील महिला कर्मचाऱ्यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. श्री. सुरेश वाघमारे यांनी महिला दिनाचे महत्त्व विशद केले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी आपल्या भाषणातून स्त्री शक्तीचे महत्त्व सांगितले. ✲

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

**शिवजयंती**

दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. इ. ५वी ते इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग कथन केले. पोवाडे गीत सादर केले. श्री. गौरव झुरडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकलेल्या गडकिल्ल्यांची आणि पराक्रमाची माहिती सांगितली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी शिवजन्म पूर्व राजकीय व सामाजिक पार्श्वभूमी कथन करून शिवरायांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग कथन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले.

**इयत्ता दहावी आशीर्वाद समारंभ**

दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी इ. १०वी आशीर्वाद समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षकवृंद, सर्व संस्था कर्मचारी आणि इ. १०वीचे विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजन संपन्न झाले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी यांचे स्वागत आणि सत्कार केला. इ. १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मनोगतातून इ. ५वी ते इ. १०वीच्या प्रवासातील संस्था आणि विद्यालय जीवनातील अनेक आठवणी व्यक्त केल्या. शाळा आणि पुणे विद्यार्थी गृह संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. सर्व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात महत्त्वाच्या सूचना दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन, कार्यवाही इ. १० वी दहावीच्या चि. ईशान गवळी या विद्यार्थ्याने केले. चि. नितीन महाले या विद्यार्थ्याने आभार मानले. कार्यक्रमानंतर सर्वांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला.

**दासनवमी**

दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयात दासनवमीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी सौ. सुवर्णा महाबळ, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर पालक - शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्री. सुदाम सूर्यवंशी, सर्व शिक्षकवृंद, आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

मान्यवरांनी श्री. रामदास स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. सौ. सुवर्णा महाबळ यांनी विद्यार्थ्यांना मनाच्या श्लोकांची संथा दिली आणि श्लोकांचे अर्थ विविध उदाहरणे, दाखले देऊन सांगितले. श्री. महाबळ

यांनी श्री रामदास स्वामींच्या जीवनातील विविध प्रसंग कथन केले. आणि विद्यार्थ्यांचे आचरण कसे असावे? याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. तेजश्री जोशी यांनी केले. श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी आभार मानले.

**मराठी भाषा गौरव दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे अध्यक्षतेखाली मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि शिक्षक वृंदांनी कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कुसुमाग्रजांचे बालपण, शिक्षण आणि साहित्यिक कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. इ. ५वीच्या विद्यार्थ्यांनी 'पाण्याचे महत्त्व'ही नाटिका सादर करून पाणी जपून वापरा असा संदेश दिला. इ. ७वी व ८वीच्या विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांविषयी माहिती सांगितली. इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी कवी कुसुमाग्रजांचे साहित्य, नाटक, एकांकिका, कथासंग्रह इत्यादी साहित्य संपदेचे वाचन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी केले सूत्रसंचालन सौ. तेजस्वी जोशी यांनी केले.

**राष्ट्रीय विज्ञान दिन**

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयात मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे अध्यक्षतेखाली विज्ञान दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी भौतिकशास्त्राचे नोबेल पुरस्कार प्राप्त चंद्रशेखर व्यंकट रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. इ. ६वी व ७वीच्या विद्यार्थ्यांनी 'चला जाऊया शेतावर' या नाटिकेचे सादरीकरण केले. विज्ञान शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी डॉक्टर सी. व्ही. रमण यांचे बालपण शिक्षण आणि संशोधन कार्याविषयी माहिती सांगितली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले.

**विशेष सत्कार**

दि. ३ मार्च २०२५ रोजी संचालक श्री. अमोल जोशी यांची संस्थेच्या उपकार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांचे हस्ते त्यांना शाल, श्रीफळ आणि पुष्प गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी श्री. अमोल जोशी यांच्या सामाजिक, शैक्षणिक कामगिरीबद्दल माहिती सांगितली, आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी सर्व शिक्षक वृंदाच्या वतीने श्री. अमोल जोशी यांची उपकार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शिक्षक प्रतिनिधी सौ. तेजश्री जोशी यांनी आभार मानले.

**जागतिक महिला दिन**

दि. ८ मार्च २०२५ रोजी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी महिला दिनाचा इतिहास आणि महिला दिनाचे महत्त्व सांगितले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी विद्यालयातील महिला शिक्षकांचा आणि महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी विविध क्षेत्रातील महिलांच्या योगदानविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. गौरव झुरडे यांनी केले. श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

**पर्यावरण पूरक होळी**

दि. १३ मार्च २०२५ रोजी विज्ञान शिक्षिका सौ. अस्मिता बावधनकर यांनी पर्यावरण पूरक होळी याविषयी विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी होळी या सणाचे अध्यात्मिक, पौराणिक महत्त्व सांगितले. होळी या सणाविषयी विविध कथा सांगितल्या. पर्यावरण पूरक होळी कशी साजरी करावी नैसर्गिक रंगांचा वापर, कृत्रिम आणि रासायनिक

रंगांचे दुष्परिणाम सांगितले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी आभार मानले आणि 'होळी लहान करा,पोळी दान करा' असे सुचविले.

**अभिनंदनीय**

✻ दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी मानवधन शैक्षणिक व सामाजिक संस्थेतर्फे विज्ञानधारा एकांकिका स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण ३२ शाळांनी सहभाग घेतला. विद्यालयातील इयत्ता सहावी, सातवीच्या विद्यार्थ्यांनी 'चला जाऊया शेतावर' ही नाटिका सादर केली. या स्पर्धेत सहभागी चि. ऋषभ रामदास गायकवाड इ. ७वी या विद्यार्थ्यास उत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक देऊन प्रमुख अतिथींच्या हस्ते गौरविण्यात आले. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षक वृंद आणि सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने चि. वृषभ गायकवाड चे कौतुक करण्यात आले. या विद्यार्थ्यांना श्रीमती सुनंदा ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले.

✻ गजानन महाराज सेवा संघ, नाशिक यांचे मार्फत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. स्पर्धांमध्ये पुढील विद्यार्थ्यांना सुयश मिळाले.

**निबंध स्पर्धा**

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक | इयत्ता |
|---|---|---|
| चि. मानस विष्णू मानभाव | द्वितीय | ८ वी |
| चि. साहिल संतोष पाटील | उत्तेजनार्थ | ९वी |

**सुंदर हस्ताक्षर स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| चि. मानव सुरेश तुंगार | उत्तेजनार्थ | ७ वी |
| चि. ओंकार सुधाकर गवळी | उत्तेजनार्थ | ९वी |

**चित्रकला स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| चि. रुपेश शांताराम जाधव | तृतीय | ८ वी |

सर्व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे संस्थेच्या आणि विद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

✻ जागतिक महिला दिनानिमित्त श्री कालिकादेवी संस्थान तर्फे शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांना कर्तृत्ववान महिला पुरस्कार महानगरपालिका आयुक्त सौ. मनीषा खत्री आणि कालिका संस्थेचे अध्यक्ष श्री. केशवराव पाटील यांचे हस्ते देऊन सन्मान करण्यात आला. संस्थेच्या आणि विद्यालयाच्या वतीने श्रीमती सुनंदा ठाकरे यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!

**भावपूर्ण श्रद्धांजली**

दि. १८ फेब्रुवारी २०२५ पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या हितचिंतक आणि देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांना मुख्याध्यापक सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !**

✻✻✻

**अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक**



मराठी राजभाषा गौरवदिन कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. किशोर बाबुराव शिंदे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, सोबत सर्व विभाग प्रमुख

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा साठे**

## पूर्व प्राथमिक विभाग

### शाळेची वार्षिक सहल

विभागाची वार्षिक सहल दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथील हॉटेल संस्कृती येथे नेण्यात आली होती. ही सहल मुलांसाठी आनंद घेण्याची एक उत्तम संधी ठरली. सहलीच्या ठिकाणी मुलांचे ढोल वाजवून स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद लुटला.

### आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. चांगले आरोग्य हे प्रत्येक व्यक्तीसाठी खूप गरजेचे असते. आरोग्य तपासणी ही नियमितपणे होणे गरजेची असते. यालाच अनुसरून विभागात वैद्यकीय तपासणी शिबिर घेण्यात आले. यासाठी शाळेने काही तज्ज्ञ डॉक्टरांना बोलावले होते. डॉक्टरांनी प्रत्येक विद्यार्थ्याची तपासणी करून त्यांचा वैद्यकीय अहवाल दिला.

### शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

हिंदवी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजा केली. विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याविषयी माहिती देण्यात आली. काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, जिजामाता, मावळे याच्या पारंपरिक वेशभूषा परिधान करून पोवाडे, तसेच महाराजांचा पाळणा म्हंटला व त्यांच्या विषयी ऐतिहासिक माहिती दिली. यातून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल माहिती तसेच प्रेरणा देखील मिळाली.

### पांढरा रंग दिवस साजरा

दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी श्वेत रंग दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान केले. तसेच पांढऱ्या रंगाच्या वस्तू प्रत्येक विद्यार्थ्याने सोबत आणल्या होत्या. विद्यार्थ्यांना पांढऱ्या रंगाविषयी माहिती देण्यात आली.

### राष्ट्रीय विज्ञान दिवस

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका सौ. संजीवनी पाटील यांनी केले. हा दिवस वैज्ञानिक चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो, असे त्यांनी सांगितले. या दिवशी अनेक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना रासायनिक प्रक्रिया कशी होते? जंतू संरक्षण, स्थिर वीज, सिंक आणि फ्लोट, हवा कशी जागा व्यापते अशा वेगवेगळ्या प्रकारचे वैज्ञानिक प्रयोग करून दाखवले. यातून विद्यार्थ्यांना हे समजले, की काही गोष्टींच्या मागे जादू नसून वैज्ञानिक कारणे असतात.

***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## प्राथमिक विभाग

### इंग्लिश मॅरेथॉन परीक्षेतील यश

इ. १ली ते इ. ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्लिश मॅरेथॉन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल जानेवारी २०२५ रोजी जाहिर झाला. या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले. या परीक्षेला २५९ विद्यार्थी बसले होते. त्यातील नऊ विद्यार्थी प्रथम क्रमांक, नऊ विद्यार्थी द्वितीय क्रमांकाने तर नऊ विद्यार्थी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले तसेच २१८ विद्यार्थ्यांनी पदक संपादन केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे,

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ ली | कु. शिवन्या प्रितेश परदेशी | प्रथम |
| | कु. सृष्टी संदीप शिसोदे | द्वितीय |
| | कु. ओनिश गणेश कुलकर्णी | तृतीय |
| २ री | कु. ईश्वरी वासुदेव खोडे | प्रथम |
| | कु. मनस्वी मनोज येवले | प्रथम |
| | कु. स्वयंम स्वप्नील जाधव | द्वितीय |
| | कु. श्रीराज सागर निकम | द्वितीय |
| | कु. स्वरूप अनिल भामरे | तृतीय |
| ३ री | कु. ग्रीष्मा राजेश थेटे | प्रथम |
| | कु. दुर्वेश देविदास बागुल | द्वितीय |
| | कु. जय तुषार बाफना | तृतीय |
| ४ थी | कु. श्रावणी विजय चव्हाण | प्रथम |
| | कु. देवांश योगेश शेटे | द्वितीय |
| | कु. राधिका सचिन खैरनार | तृतीय |
| | कु. तोशिका तुषार कुशारे | तृतीय |
| ५ वी | कु. रियांश गणेश पवार | प्रथम |
| | कु. निर्मल संतोष जगताप | द्वितीय |
| | कु. रुही सुरेशभाई भोजानी | तृतीय |
| ६ वी | कु. सक्षम विष्णू महाले | प्रथम |
| | कु. लोकेश बबन सोनवणे | द्वितीय |
| | कु. आदित्य गणेश टारगे | द्वितीय |
| | कु. रुद्र दत्तात्रय सोनवणे | तृतीय |
| ७ वी | कु. अर्णव गौतम म्हात्रे | प्रथम |
| | कु. आशुतोष सत्यशील दुबल | द्वितीय |
| | कु. हर्षल रमेश थविल | तृतीय |

### शिक्षकांचे प्रशिक्षण

दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी शिक्षकांचे सक्षमीकरण तसेच NEP अंतर्गत शिक्षकांचे उद्‌बोधन करण्यासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी श्रेया लालवाणी यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणांतर्गत शिक्षकांना नवीन शैक्षणिक आयोग आणि नवीन अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन करण्यात आले.

### नाशिक लिटिल चॅम्प स्पर्धा

नाशिक लिटिल चॅम्प आयोजित विविध स्पर्धेमध्ये काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यातील चित्रकला स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे

| इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|
| १ली | कु. शरण्या जोशी,<br>कु. देवांश सपकाळे |
| २री | कु. मिस्टी बडूस, कु. शिवांश नवले,<br>कु. विराज सोनवणे, कु. शरयू जगदाळे |
| ३री | कु. कृष्णा रोहिदास |
| ४थी | कु. हेतवी शेवाळे, कु. आराध्या सूर्यवंशी |
| ६वी | कु. अंश जगदाळे, कु. स्पंदना म्हसदे |
| ७वी | कु. श्लोक कुमावत |

### स्काउट गाइड कॅम्प

दि. १४ व १५ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ६वी व इ. ७वीच्या विद्यार्थ्यांचा स्काउट गाइड कॅम्प विक्रमगड या ठिकाणी नेण्यात आला होता. तिथे विद्यार्थ्यांकडून विविध साहसी कृती करून घेतल्या. तसेच गिर्यारोहण आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

### शिवजयंती उत्साहात साजरी

दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेत शिवजयंती निमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन केले. शिक्षिका सौ. पूजा देशपांडे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी इ. १ली व इ. २रीचे विद्यार्थी शिवाजी महाराजांची वेशभूषा करून आले होते. इ. ४थीच्या विद्यार्थ्यांनी गीत सादर केले. इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी पोवाडा सादर केला.

### प्रदर्शनास भेट

दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ४थी व इ. ५वीच्या विद्यार्थ्यांना म्हसरूळ येथे शिवकालीन नाणी व शस्त्रात्रे प्रदर्शन बघण्यासाठी नेण्यात आले होते. तिथे विविध शिवकालीन शस्त्रात्रांची माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली.

**बेडेन पॉवेल जयंती**

दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी स्काऊट गाइडचे संस्थापक रॉबर्ट बेडेन पॉवेल यांची जयंती साजरी करण्यात आली. पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन गाइड कॅप्टन सौ. माधुरी गवळी व सौ. प्रमिला यांनी केले. तसेच गाइड स्थापनेचा उद्देश व कार्य याबद्दल माहिती सांगितली. इ. ५वी ते इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी स्काउट गाइड, झेंडागीत, प्रतिज्ञा व प्रार्थना म्हंटली.

**श्रध्दांजली सभा**

पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या प्रमुख आधारस्तंभ आणि देणगीदार श्रीमती गंगुताई सदाशिव धामणकर यांचे दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह म्हसरूळ शाखा येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कै. श्रीमती गंगूताई धामणकर यांच्या भगिनी श्रीमती सिंधुताई धामणकर, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. सुनील रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, श्री. आनंद कुलकर्णी, आणि श्री. अमोल जोशी हे उपस्थित होते. या शोकसभेसाठी म्हसरूळ संकुलातील तसेच पंचवटी आणि तळेगांव अंजनेरी शाखेतील प्राचार्य, शाखा प्रमुख, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी श्रीमती गंगुताई धामणकर यांना आंदरांजली वाहिली.

**मराठी भाषा गौरव दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी कुसुमाग्रज व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. शिक्षिका सौ. रुपाली खरोटे यांनी कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या साहित्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. विद्यार्थिनी कु. ओजस्वी घडवजे इ. ४थी हिने मराठी मायबोली गीत सादर केले. मराठी दिनानिमित्त इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम घेण्यात आले.

**इयत्ता घेण्यात आलेला उपक्रम**

| इयत्ता | उपक्रम |
|---|---|
| १ली | अक्षरपट्टी बनवणे |
| २री | घोषवाक्य बनवणे |
| ३री | चित्रावरून गोष्ट सांगणे |
| ४थी | संतांची कामगिरी |
| ५वी | कवी व लेखकाची माहिती संकलित करणे |
| ६वी | गड व किल्ले यांचा माहिती तक्ता तयार करणे |
| ७वी | शुभेच्छा कार्ड बनवणे |

**स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी संपन्न**

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. रेखा जंजाळ यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्वातंत्र्यलढ्याविषयी माहिती सांगितली.

**विज्ञान दिन**

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. इ. ४थीच्या विद्यार्थिनींनी शारीरिक अवयवांच्या प्रतिकृती तयार केल्या. तसेच शिक्षिका सौ. सोनाली जोशी यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाबद्दल माहिती सांगितली. इ. ५वीच्या विद्यार्थ्यांनी विविध शास्त्रज्ञांच्या माहितीवर तक्ते बनविले. इ. ६वी व इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी विविध सायन्स मॉडेल बनविले.

***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

**माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग**

### विधानभवन आणि नेहरू विज्ञान केंद्राला भेट

इ. ८वी आणि ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. या सहलीचा उद्देश विद्यार्थ्यांना नागरिक शासनव्यवस्था आणि वैज्ञानिक प्रयोगांची प्रत्यक्ष अनुभूती देणे हा होता. सहलीची सुरूवात महाराष्ट्र विधानभवनाच्या भेटीने झाली. विधानभवनाच्या वास्तूमध्ये विद्यार्थ्यांनी राज्याच्या विधिमंडळाच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती मिळवली. विधान भवनात कायदे कसे तयार होतात, चर्चा कशा होतात, याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला. या अनुभवामुळे विद्यार्थ्यांच्या लोकशाही आणि शासन व्यवस्थेबद्दलच्या समजुती अधिक दृढ झाल्या.

यानंतर विद्यार्थ्यांनी नेहरू विज्ञान केंद्राला भेट दिली. हे केंद्र भारतातील सर्वांत मोठ्या विज्ञान केंद्रांपैकी एक आहे. ज्यामध्ये ५०० हून अधिक विज्ञान प्रदर्शनं आहेत. विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक मॉडेल्स पाहिली आणि थेट प्रात्यक्षिकांचा आनंद घेतला. '३डी विज्ञान शो' ने विज्ञानविषय अधिक रोचक आणि समजण्यास सोपा केला.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली. विधानभवनातील भेटीमुळे राज्याची कायदाप्रक्रिया आणि शासन व्यवस्थेची सखोल माहिती मिळाली. नेहरू विज्ञान केंद्रातील प्रयोग आणि प्रदर्शनांनी विज्ञानाची आवड वाढवली. या अनुभवांनी विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढवले. तसेच शिक्षण हे अधिक अर्थपूर्ण व आनंददायक बनले.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा संपन्न

डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल आणि विखे पाटील मेमोरियल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) आणि त्यांच्या अंमलबजावणीवर शिक्षण प्रबोधन कार्यक्रम तथा कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत विविध शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी सहभाग घेतला होता. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP)च्या परिवर्तनशील आणि वर्ग खोल्यांमध्ये त्यांची अंमलबजावणी कशी करावी यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. धामणकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाघचौरे, शिक्षणशास्त्र आणि संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे, पल्लवी विधाते, उमा पार्वती, सी. एस. लता, जय ललिता रामानंद, वैशाली चौधरी, शिल्पा भामरे, देवयानी भडाने, स्वाती टोपे, श्वेता जपे, मंगला एकखंडे सहभागी झाले होते. कार्यशाळेच्या प्रसंगी स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी केले. श्रीमती श्रेया लालवानी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी स्पर्धात्मक शिक्षण, पाठ नियोजन तसेच विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवणाऱ्या अध्यापक पद्धती आणि मूल्यमापन सुधारणा विषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संवादी कार्यशाळा आणि चर्चासत्रं आयोजित करण्यात आली होती. क्षमता आधारित मूल्यमापन आणि सुधारित अध्यापनपद्धती यावर देखील चर्चा करण्यात आली. कार्यशाळेचे सूत्रसंचालन सौ. सोनिया राजवाडे यांनी केले. विखे पाटील मेमोरियल स्कूलचे चिट्टे यांनी आभार मानले.

### जागतिक रेडिओ दिन

दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी जागतिक रेडिओ दिनानिमित्त 'सात दिन का साथ आरजे विश्वास के साथ'च्या अंतर्गत वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचा विषय होता '२१ वे शतक आणि हवामानातील बदल'. या स्पर्धेत शाळेतील चार

विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. तसेच इतर शाळेतील विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. त्यात एकूण अंतिम सात स्पर्धक विजेते म्हणून घोषित करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थिनी कु. लेखा शेंडे इ. १० वी हिने तृतीय क्रमांक पटकावला. कु. लेखा शेंडे हिचे मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

### दहावीसाठी निरोप समारंभाचे आयोजन

इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी शालेय प्रार्थनेने केली. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे नृत्य सादर करण्यात आले. याप्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागवून, विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना यशाचा मूलमंत्र दिला. तसेच परीक्षेच्या काळात शारीरिक व मानसिक आरोग्य कसे जपावे, याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. त्यांनी शिक्षक आणि शाळेच्या वातावरणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या यशाचा, शिस्तीचा, व शंभर टक्के हजेरीचा गौरव करण्यात आला. तसेच नर्सरी ते इ. १०वीच्या शालेय जीवन प्रवासावर व्हिडिओद्वारे प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहील अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली गाजरे यांनी केले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे व सौ. प्रतिमा वैद्य, पालक वर्ग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### शिवजयंती उत्साहात साजरी

दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंती संस्कृतीचा वारसा जपत साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. इ.९वीच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती दिली. शौर्य, न्याय आणि देशभक्ती या मूल्यावर भर देत विद्यार्थ्यांनी शिवस्तुती, पोवाडा, राजमुद्रा व त्याचा अर्थ आणि सादर केला. याप्रसंगी विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ***

*** डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक ***




**जागतिक रेडिओ दिनानिमित्त**
**'२१ वे शतक आणि हवामानातील बदल'**
**या विषयावर आयोजित वक्तृत्त्व स्पर्धेमध्ये**
**मान्यवरांच्या हस्ते तृतीय क्रमांकाचे**
**बक्षीस स्वीकारताना**
**विद्यार्थिनी कु. लेखा शेंडे, इ. १० वी**

## शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. सुरेश पाटील**

### क्षेत्र भेट

दि. ५ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील छात्र शिक्षकांनी पेठ रोड वरील ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या चामर लेणी आणि गजपंथ या तीर्थक्षेत्री परिसर भेट देऊन अनोखा अनुभव घेतला. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. छात्र शिक्षकांना इतिहास, संस्कृती आणि धार्मिक वारसा यांची ओळख करून देण्यासाठी या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

